दैनिक
# महाराष्ट्र जीत
मुख्य सपादक सागर राणा अभोरे सपादक बडूभाऊ इगोले
RNI No - MHMUL/25/A0788
वाशीम ■ गुरुवार दि. 31 जुलै 2025 ■ वर्ष : 2 ले ■ अंक : 81 ■ पाने : 4 ■ किंमत : 5 रूपये ■ Title code:- MAHMUL03935

# अमेरिकेचा भारताला तडाखा

## भारतीय वस्तूंवर १ ऑगस्टपासून २५ टक्के 'टॅरिफ'

**वॉशिंग्टन :** अमेरिकेने भारतावर १ ऑगस्टपासून तब्बल २५ टक्के आयात शुल्क (टॅरिफ) लावणार असल्याचे बुधवारी जाहीर केले. यामुळे अमेरिकेत निर्यात होणाऱ्या भारतीय वस्तू तेथे महाग होणार असून त्याचा विपरित परिणाम भारताच्या व्यापारावर होणार आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'ट्रुथ' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर 'पोस्ट' करून या निर्णयाची माहिती दिली.

गेल्या काही दिवसांपासून भारत व अमेरिकेत व्यापार करार होणार असल्याच्या चर्चा रंगत होत्या. दोन्ही देशांच्या अधिकाऱ्यांमध्ये, नेत्यांमध्ये यासंबंधी बैठका चालू होत्या. जुलै महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात हा करार पूर्ण होईल, असे दावे केले जात होते. मात्र, २९ जुलैपर्यंत हा करार पूर्ण झाला नाही. या पार्श्वभूमीवर बुधवारी (३० जुलै) अमेरिकेने भारतावर २५ टक्के टॅरिफ लावण्याचा निर्णय जाहीर केला आहे.

"आमचा भारतासोबतचा व्यापार प्रचंड तुटीचा आहे. त्यामुळे भारताला १ ऑगस्टपासून २५ टक्के आयात शुल्कासोबतच दंडही भरावा लागणार आहे," असे ट्रम्प यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, अमेरिकेचे एक शिष्टमंडळ पुढच्या महिन्यात भारत दौऱ्यावर येणार असून, प्रस्तावित द्विपक्षीय व्यापार कराराच्या पुढील

### राष्ट्रीय हिताचे रक्षण करणार – भारत

सरकार आपल्या शेतकरी, उद्योजक आणि सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या कल्याणाचे रक्षण करण्यास सर्वोच्च महत्त्व देते. भारताच्या राष्ट्रीय हितांचे रक्षण करण्यासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलण्यात येतील', अशी प्रतिक्रिया भारताने अमेरिकेच्या 'टॅरिफ'च्या निर्णयावर रात्री उशिरा दिली.






### रशियाकडून शस्त्रे खरेदी केली म्हणून दंडही आकारणार – ट्रम्प

"भारत हा आपला मित्र देश असला तरी, आम्ही त्यांच्याशी तुलनेने कमी व्यावसाय केला आहे. जगातील सर्वात जास्त आयात शुल्क भारत लादत आहे आणि त्यांच्याकडे सर्वात कठीण आणि त्रासदायक व्यापार अडथळे आहेत. तसेच, त्यांनी नेहमीच त्यांचे बहुतांश लष्करी साहित्य रशियाकडून खरेदी केले आहे. चीनसह रशियाकडील तेलाचे ते सर्वात मोठे खरेदीदार आहेत. सर्व जग रशियाला युक्रेनमधील विध्वंस थांबवण्यास सांगत असताना या बाबी योग्य नाहीत. त्यामुळे भारताला १ ऑगस्टपासून २५ टक्के आयात शुल्क तसेच वरील कारणांसाठी दंड आकारला जाईल", अशी भूमिका डोनाल्ड ट्रम्प यांनी मांडली आहे.

# २०११ पर्यंतच्या झोपडीधारकांना लॉटरी

## अतिक्रमित झोपडीधारकांना मिळणार ५०० चौरस फुटांचे घर

### शासकीय भूखंडावरील अतिक्रमणधारकांना राज्य सरकारचा दिलासा

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची घोषणा



**मुंबई :** जिल्हाधिकारी, गायरान जमीन, सार्वजनिक बांधकाम विभाग, एमआयडीसी, एमएमआरडीए, गृहनिर्माण संस्था तसेच राज्य शासनाच्या राज्यात विविध ठिकाणी जमिनी आहेत. या शासकीय जमिनींवर ३१ डिसेंबर २०११ पूर्वीचे अतिक्रमण असल्यास तेथील ३० लाख नागरिकांना ५०० चौरस फुटांचे मोफत घर पंतप्रधानांच्या 'सर्वांना घरे' या योजनेंतर्गत मिळणार आहे. तसेच पाकिस्तानातील विस्थापित ५ लाख सिंधी कुटुंबियांना 'प्रॉपर्टी कार्ड' देण्यात येणार असल्याची घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली.

### सिंधी विस्थापितांना 'प्रॉपर्टी कार्ड' देणार

ठाणे, उल्हासनगर वगळता महाराष्ट्रातील ३५ शहरांमध्ये ५ लाख पाकिस्तानातील विस्थापित सिंधी कुटुंबीय आहेत. ५ लाख सिंधी विस्थापितांना 'प्रॉपर्टी कार्ड' देण्यात येणार आहेत. मात्र, उल्हासनगरमध्ये सिंधी विस्थापितांच्या जमिनी कोणाच्या नावावर आहेत, याची तपासणी करण्यासाठी ड्रोनद्वारे सर्वेक्षण करण्यात येणार आहे.

### ... तर शासकीय जागेचा ताबा घेणार

शिक्षण, आरोग्य, सार्वजनिक उपक्रमासाठी शासकीय भूखंड देण्यात आले आहेत. शासकीय भूखंडावर रुग्णालय असले तरी तेथे २० टक्के खाटा आरक्षित नसणे, शैक्षणिक उपक्रम न राबवता व्यावसायिक वापर होत असल्याचे निदर्शनास येताच ती जागा सरकार आपल्या ताब्यात घेणार, असा इशारा बावनकुळे यांनी दिला.

### खड्ड्यांचे साम्राज्य



वडाळ्यातील बीपीटी रोडवर एक मोठा खड्डा पडला आहे. त्यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत आहे. वाहतुक सुरळीत व्हावी यासाठी येथे वाहतूक पोलीस तैनात करण्यात आले आहेत. (छाया : विजय गोहिल)

# मला कोणी राजकारण शिकवू नये – भास्कर जाधव

**मुंबई :** ४० वर्षे मी राजकारणात असून राजकारण मला कोणी शिकवू नये, लाथ मारेन तिथे पाणी काढायची धमक आहे, असे भावनिक पत्र ठाकरेंच्या शिवसेनेचे गुहागर येथील आमदार भास्कर जाधव यांनी आपल्या कार्यकर्त्यांना लिहिले आहे.

राजकारण करायला मला कोणी शिकवण्याची गरज नाही. ४० वर्षे मी याच क्षेत्रात आहे. एक गेला तर चार निर्माण करेन, असा इशारा भास्कर जाधव यांनी पत्रातून दिला आहे. मी आक्रमक असलो तरी अत्यंत संवेदनशील आहे. जे गेलेत ते आता बाकी सर्वांना फोन करून आम्ही विकासासाठी गेलो आहोत, तुम्हीही आमच्यासोबत या, असे सांगत आहेत, असा उलगडा जाधव यांनी पत्रातून केला आहे.

भास्कर जाधव यांच्यावर आमचा राग नाही, मतदारसंघाचा व आमच्या भागाचा विकास हा भास्कर जाधव यांनीच केला, कोट्यवधीचा निधी हा भास्कररावांच्या माध्यमातूनच आला...' ही वाक्य व ही भाषा आहे गेल्या काही दिवसांत पक्ष सोडून गेलेल्या लोकांची, आणि मग जाण्याचे कारण काय सांगतात तर आम्हाला सत्तेत जायचे आहे, आम्हाला विकास करून घ्यायचा आहे. व्वा ! मला हा विषय तुम्हा सर्वांशी बोलावासा वाटला, कारण मी स्वतः संभ्रमात आहे. ज्या विकासाचे कारण देऊन तुम्ही अन्य पक्षात गेल्याचे स्वतःचे समर्थन करताय म्हणजेच स्वतःशी खोटे बोलून जनतेची फसवणूक करत आहात, यांची विकासाची नक्की व्याख्या काय? स्पष्टपणे एखाद्या विशिष्ट कामाचा उल्लेख यांच्याकडून ऐकलात का आपण?, धादांत खोटे बोलून केवळ आणि केवळ वैयक्तिक स्वार्थासाठी आणि सत्तेच्या हव्यासापोटी हा पक्षप्रवेश झाला आहे, असेही पत्रात नमूद केले आहे.

### ठाकरेंचा भगवा डौलाने फडकवत ठेवेन !



अजून माझी आमदारकीची चार वर्षे बाकी आहेत याची जाणीव स्वकीयांना नसली तरी विरोधकांना नक्की आहे. लाथ मारेन तिथे पाणी काढायची माझ्यात धमक आहे आणि हो त्याउपर याबाबतीत तुमच्या मनात कसलीही शंका असेल तर थेट माझ्याशी बोला. अफवांवर विश्वास ठेऊ नका. तुम्हाला सोबत घेऊन आपल्या उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचा भगवा डौलाने फडकवत ठेवेन याची खात्री देतो. लवकरच गावी आणि मुंबईला जाहीर मिळावे घेणार आहे. त्यावेळेला भेटू आणि खूप काही बोलू, असे भास्कर जाधव म्हणाले.

# विद्रोहीतर्फे ३ ऑगस्टला मराठी भाषा व संस्कृती संरक्षण परिषद

**मुंबई :** महाराष्ट्रासह दक्षिणेकडील राज्यांवर पहिलीपासून हिंदी सक्तीची करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी दोन जीआर मागे घेतले तरीही तिसऱ्या जीआरनुसार नरेंद्र जाधव समिती नेमून सक्तीची टांगती तलवार ठेवलीच आहे. या विरोधात विद्रोही सांस्कृतिक चळवळीच्या वतीने संयुक्त महाराष्ट्राचे शिल्पकार लोकशाहीर कॉ. अण्णाभाऊ साठे व क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या जयंतीच्या निमित्ताने ३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०.३० वा. छ. संभाजीनगर येथे राज्यव्यापी मराठी भाषा व संस्कृती संरक्षण परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. प्रा. डॉ. दीपक पवार हे या परिषदेचे उद्घाटन करणार आहेत.

### परिसंवाद आणि खुला मंच

रविवारी तीन ऑगस्ट रोजी दिवसभर चालणाऱ्या या परिषदेत उद्घाटनसत्रा व्यतिरिक्त दोन परिसंवाद, एक खुला मंच व एक कवी संमेलन होणार आहे.

# कृषीमंत्री १८ मिनिटे पत्ते खेळत असल्याचे अहवालातून उघड

## रोहित पवार यांची एक्सवर पोस्ट

**मुंबई :** वादग्रस्त विधानामुळे महायुती सरकारसाठी डोकेदुखी ठरलेले कृषीमंत्री माणिकराव कोकाटे हे ४२ सेकंद नव्हे, तर १८ ते २२ मिनिटे सभागृहात पत्ते खेळत असल्याचा अहवाल विधी मंडळाचा असून मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री अजित पवार यांना सादर करण्यात आला आहे, अशी माहिती शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते रोहित पवार यांनी एक्सवर पोस्ट करत दिली. कृषीमंत्री माणिकराव कोकाटे हे सभागृहात पत्ते खेळत असतानाचा व्हिडिओ रोहित पवार यांनी पोस्ट केला होता. त्यानंतर हा व्हिडिओ प्रचंड वायरल झाला आणि कोकाटे यांच्या विरोधात संतापाची लाट उसळली होती. विरोधकांनी या मुद्द्यावर जोरदार आवाज उठवत कोकाटे यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली होती.

### सरकार याबाबत खुलासा करेल का?

कृषीमंत्री हे सभागृहात केवळ ४२ सेकंद पत्ते खेळत नव्हते, तर तब्बल १८ ते २२ मिनिटे पत्ते खेळत असल्याचा विधान मंडळाच्या चौकशीचा अहवाल असून हा अहवाल मुख्यमंत्री तसेच उपमुख्यमंत्री यांच्याकडे सादर केला असल्याची माहिती आहे. सरकार याबाबत खुलासा करेल का? असा सवाल रोहित पवार यांनी केला आहे.

# 'बीडीडीवासीयांना गणेशोत्सवापूर्वी घरांचा ताबा द्या'

**मुंबई :** नवीन घरात राहण्याचे प्रत्येकाचे स्वप्न असून वरळी बीडीडी पुनर्विकास प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील डी आणि ई या दोन इमारतींना भोगवटा प्रमाणपत्र मिळाले आहे. त्यामुळे फेज १ अंतर्गत तयार झालेल्या ५५६ लाभार्थ्यांना गणेशोत्सवापूर्वी घराचा ताबा मिळावा आणि आठडाभरात चावी वितरण करावे, अशी मागणी वरळीचे आमदार आदित्य ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून केली आहे.

पहिल्या टप्प्यातील पुनर्वसन इमारत १ मधील एकूण ८ विंगपैकी डी आणि ई या दोन इमारतींना ओसी मिळाली आहे. तसेच पुनर्विकास प्रकल्पाच्या फेज १ अंतर्गत ५५६ घरे पूर्णतः तयार झाली आहेत. लॉटरीद्वारे निवड झालेली घरे लाभार्थ्यांना देण्यासाठी सज्ज आहेत. लाभार्थीही चाव्या मिळाव्यात, यासाठी इच्छुक आहेत, असे आदित्य ठाकरे म्हणाले.

# आयटीआयमध्ये सोलर टेक्निशियन, ईव्ही मेकॅनिक अभ्यासक्रम



**मुंबई :** महाराष्ट्रातील ७० शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये (आयटीआय) सोलर टेक्निशियन (इलेक्ट्रिक), ईव्ही मेकॅनिक (इलेक्ट्रिक व्हेईकल) हे नवीन अभ्यासक्रम शिकविण्यात येणार आहेत. तसेच चेंबूर येथे शासकीय उच्चस्तरीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थापनेसाठी मान्यता देण्यात आली आहे. काळानुरूप बदलत्या अभ्यासक्रमामुळे रोजगाराच्या संधीमध्ये वाढ होऊन यामुळे महाराष्ट्रातील आय.टी.आय.मध्ये क्रांती घडणार असल्याचा विश्वास कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी व्यक्त केला.

पर्यावरण संवर्धनावर आधारित योजना राबवण्यावर राज्य शासनाचा भर असून राज्यात सौर ऊर्जेशी निगडीत तंत्रज्ञानांची व सोलर टेक्निशियन तसेच मेकॅनिक इलेक्ट्रिक व्हेईकलची गरज लक्षात घेऊन या क्षेत्रातील टेक्निशियन मागणी वाढणार आहे.

### ७० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये अभ्यासक्रम

ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर आणि मित्राचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांच्या सूचना व सल्ल्याने औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये काळानुरूप अभ्यासक्रम सुरू करण्यात येत आहे. सध्या राज्यातील ७० औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमध्ये हा अभ्यासक्रम शिकविण्यात येणार आहे. ज्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था नवीन अभ्यासक्रमांची मागणी करतील त्यांना मंजुरी देण्यासाठी कार्यवाही करण्यात येईल, असेही मंत्री लोढा यांनी सांगितले.

# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे धडे

### आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांचे निर्देश

**मुंबई :** महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनात समावेश करत विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण देण्यात यावे, असे निर्देश आपत्ती व्यवस्थापन, जलसंपदा (विदर्भ, तापी, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ) मंत्री गिरीश महाजन यांनी दिले. तसेच आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना संदर्भात सर्व शासकीय यंत्रणांनी ॲक्शन मोडमध्ये काम करावे, अशा सूचना मंत्री गिरीश महाजन यांनी दिल्या. मंत्री महाजन यांनी आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या कामकाजाचा आढावा बुधवारी मंत्रालयात घेतला. यावेळी आपत्ती व्यवस्थापन विभागाचे संचालक डॉ. भालचंद्र चव्हाण, वित्त विभागाचे सह सचिव विवेक दहिफळे, जलसंपदा विभागाचे सह सचिव रा .अ. काटपल्लीवार, मृदू व जलसंधारण विभागाचे सह सचिव वी देवराज, महावितरणचे कार्यकारी संचालक द. वी. पडळकर उपस्थित होते.

# अंधेरीतील नवकिरण मंडळातर्फे ज्येष्ठांना छत्री वाटप

**मुंबई :** अंधेरीतील नवकिरण मंडळ ही संस्था यंदा आपले रौप्य महोत्सवी वर्ष साजरे करत आहे. त्यानिमित्त पाचवी ते पदवीधर विद्यार्थ्यांना वह्या व पेन वाटप करण्यात आले. त्यासोबत ज्येष्ठ नागरिकांना छत्री वाटप करण्यात आले. आमदार अमित साटम व माजी नगरसेवक रोहन राठोड यांच्या हस्ते हे वाटप करण्यात आले.



रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त अंधेरीतील नवकिरण मंडळातर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन केले आहे. त्यात एस. आर. ए. व चाळीत राहणाऱ्या विद्यार्थ्यांना पाठबळ मिळावे तसेच दहावी व बारावीत ८० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे.

मंडळाचे संस्थापक अध्यक्ष मधुसूदन सदडेकर, जनरल सेक्रेटरी सुभाष राणे, ज्येष्ठ समाजसेवक शिवाजी बाणेकर, स्थानिक मनसे नेते राजेंद्र सोनसकर, महेंद्र सुर्वे, नरेंद्र कार्केला, संतोष चव्हाण, हरेश शेलडेकर यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.


### हस्तक्षेप करण्यास न्यायालयाचा स्पष्ट नकार

# 'अँटिलिया'च्या जमीन विक्रीसंबंधी याचिका फेटाळली

**मुंबई :** उद्योगपती मुकेश अंबानी यांच्या अँटिलिया निवासस्थानाच्या जमिनीच्या विक्रीला आव्हान देणारी जनहित याचिका उच्च न्यायालयाने फेटाळून लावली. मालमत्तेच्या स्वरूपाचा मुद्दा आधीच निकाली काढण्यात आला आहे. त्यामुळे याच मुद्द्याशी संबंधित जनहित याचिकेत हस्तक्षेप करण्याची आवश्यकता नाही, असे स्पष्ट करीत मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठाने याचिकाकर्त्याला झटला दिला.

जालना येथील रहिवाशी अब्दुल मतीन यांनी उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. २००३ मध्ये अल्टामाउंट रोडवरील अँटिलिया कमर्शियलला ४,५३२.३९ चौरस मीटर भूखंडाची केलेली विक्री रद्द करण्याबाबत निर्देश द्या, अशी विनंती मतीन यांनी याचिकेतून केली होती. जमिन विक्रीत अनियमितता झाल्याचा दावा करीत संबंधित जमीन महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाला परत देण्याची मागणी याचिकेत केली होती. हे प्रकरण २०१७ पर्यंत थंड बस्त्यात पडले होते. त्यानंतर नवीन हस्तक्षेप अर्ज दाखल करण्यात आला. तथापी, जनहित याचिका तसेच हस्तक्षेप अर्जावर कोणताही आदेश देण्यास खंडपीठाने नकार दिला आणि याचिकाकर्त्यांचे आक्षेप धुडकावले.

### जमिनीबाबत दावे-प्रतिदावे



अँटिलिया निवासस्थान उभी असलेली जमीन मूळतः खोजा समुदायातील मुलांसाठी अनाथाश्रम असलेल्या करिंबोय इब्राहिम खोजा यतिमखाना यांच्या मालकीची होती. ती बॉम्बे पब्लिक ट्रस्ट कायद्यांतर्गत नोंदणीकृत होती. अँटिलिया कमर्शियलने ती वक्फ अधिकारक्षेत्रात येत नसलेल्या धर्मनिरपेक्ष ट्रस्ट म्हणून वर्गीकृत केली होती. २००४ मध्ये महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्डाने त्या मालमत्तेवर दावा केला, असा दावा याचिकाकर्त्यांनी केला होता. तथापि, व्यवहारापूर्वी सर्व वैधानिक परवानग्या घेण्यात आल्या होत्या, असा दावा अँटिलिया कमर्शियलच्या वतीने करण्यात आला.

### अँटिलिया कमर्शियलचा युक्तीवाद कोर्टाला मान्य

अँटिलिया कमर्शियलच्या वतीने ज्येष्ठ वकील मिलिंद साठे यांनी बाजू मांडली. अशाच स्वरूपाची मागणी करणारी आणखी एक याचिका यापूर्वी याचिकाकर्त्याला दंड ठोठावून फेटाळण्यात आली होती, असे साठे यांनी खंडपीठाच्या निदर्शनास आणले. याचवेळी महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड विरुद्ध शेख युसूफ भाई चावला या प्रकरणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचा संदर्भ दिला. त्यात मालमत्तेच्या कायदेशीर स्वरूपाचा मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. न्यायालयाने त्यांचा युक्तीवाद स्विकारला आणि अँटिलिया कमर्शियलला मोठा दिलासा दिला.

## संपादकीय

# दिव्या दिव्या दीपत्कार...

जॉर्जियातील बाटुमी येथे सोमवारी नवा इतिहास लिहिला गेला. नागपूरची दिव्या देशमुख हिने अवघ्या एकोणिसाव्या वर्षी आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघ, फिडेचे जागतिक अजिंक्यपद पटकावले. भारताचे हे पहिलेच महिला अजिंक्यपद. संपूर्ण देश हरखून गेला. देशाच्या राष्ट्रपती, पंतप्रधानांपासून महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांपर्यंत मान्यवरांनी दिव्यावर कौतुकाचा वर्षाव केला. या महाराष्ट्रकन्येने विजेतपदासोबत अनेक विक्रमांनाही गवसणी घातली. स्पर्धेची अंतिम फेरी दिव्या आणि कोनेरू हम्पी या दोन भारतीय खेळाडूंमध्येच झाली.

दिव्या देशमुख हिला थेट पंधरावे मानांकन. त्यातही ती केवळ आंतरराष्ट्रीय मास्टर. बाकीच्या बहुतेक दिग्गज ग्रँडमास्टर. कोनेरी ही गेल्या पंचवीस वर्षांमधील भारताची सर्वोत्कृष्ट बुद्धिबळपटू. स्पर्धेत तिला चौथे मानांकन. तिला हरविणे हाच एक चमत्कार. परंतु, दिव्याचे यश यापुरते मर्यादित नव्हते. तिने चौथ्या फेरीत दुसरी मानांकित झू जिनर आणि उपांत्य फेरीत तिसरी मानांकित टॅन झोंगयी या चीनच्या दिग्गज दोघींना पराभूत केले होते. स्पर्धेची उपांत्य फेरी भारत विरुद्ध चीन अशीच होती. उपउपांत्य फेरीही तशीच होती. त्या फेरीत आठजणींपैकी भारताच्या चौघी व चीनच्या तिघी होत्या. अजिंक्यपद पटकावताच दिव्याला थेट ग्रँडमास्टर किताब बहाल झाला. त्यासाठी फिडे संघटनेचे नियमित तीन निकष तिला पार करावे लागले नाहीत. दिव्या आता कँडिडेट्स स्पर्धेसाठी पात्र ठरली आहे आणि तिचा एकूण धडाका पाहता ती पुढच्या वर्षीच्या जागतिक अजिंक्यपद स्पर्धेतील आव्हानवीर असेल, अशी खात्री अनेक दिग्गजांना आहे. अर्थात, दिव्याचे हे यश एक दिवसाचा चमत्कार नाही. जगज्जेते मुळात आकाशातून पडत नाहीत. त्यामागे वर्षानुवर्षांची तपश्चर्या असते. ती साधना केवळ खेळाडूच लहानपणापासून करतात असे नाही, तर त्यांचे पालकही प्रचंड कष्ट उपसत असतात. खेळाडू व त्यांच्या पालकांची ही साधना खर्चीकही असते. त्यासाठी पालकांना खासगी आयुष्य, व्यवसाय बाजूला ठेवून अपत्यांना घडवावे लागते. डॉ. जितेंद्र व डॉ. नम्रता देशमुख हे दिव्याचे आई-वडील डॉक्टर. अमरावतीच्या संत गाडगेबाबा विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. के. जी. देशमुख यांची दिव्या ही नात. आईने करिअर बाजूला ठेवून मुलीसाठी स्वतःला वाहून घेतले, तर वडिलांनी व्यवसायात गुंतवून घेतले.

दिव्याच्या जागतिक यशाने आणखी एक महत्त्वाची बाब अधोरेखित केली आहे. सात महिन्यांपूर्वी, डिसेंबरमध्ये अठरा वर्षांच्या गुकेश डोम्माराजू याने इतिहास घडविला. चीनच्या डिंग लिरेन याला हरवून जागतिक अजिंक्यपदाचा मुकुट पटकावणारा गुकेश बुद्धिबळ इतिहासातील सर्वांत तरुण जगज्जेता ठरला. त्याने वयाच्या अवघ्या बाराव्या वर्षी ग्रँडमास्टर किताब मिळविला होता. दिव्याचे फिडे जगज्जेतेपद ही गुकेशच्या सोनेरी कामगिरीची पुनरावृत्ती आहे. दोघांमध्ये अगदी विस्मयकारक अशी साम्यस्थळे आहेत. दिव्या व गुकेश दोघांचाही नागपूरशी संबंध आहे. नागपूर ही दिव्याची जन्मभूमी. चौसष्ट घरांच्या पटावरच्या सगळ्या चालींची बाराखडी तिने इथेच गिरविली. गुकेश चेन्नईचा असला तरी त्यानेही नागपूरच्या अकादमीत थोडे प्रशिक्षण घेतले. त्याने राष्ट्रीय स्तरावरील पहिले यशही नागपुरातच मिळविले. दोघेही विशीच्या उंबरठ्यावर आहेत. दोघांनीही अगदी कमी वयापासून, सात-दहा वर्षांच्या आतील वयोगटातील अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धा जिंकल्या. दोघेही आता बुद्धिबळातील सर्वोच्च स्थानी आहेत. गेल्या वर्षीच्या बुद्धिबळ ऑलिम्पियाडमधील भारताच्या सांघिक यशात दोघांचेही ठळक योगदान राहिले. याचा अर्थ भारतीय बुद्धिबळाचे भवितव्य तरुण पिढीच्या हातात केवळ सुरक्षितच नाही, तर नवा इतिहास घडविण्यासाठी ही पिढी सज्ज आहे आणि जागतिक यशाच्या गेल्या तीन दशकांमधील युगाचा पाया रचणारा विश्वनाथन आनंद या स्थित्यंतराचा प्रत्यक्ष साक्षीदार आहे. आनंदनंतर जागतिक अजिंक्यपद जिंकणारा गुकेश हा केवळ दुसरा भारतीय आणि दिव्याने पटकावलेले अजिंक्यपद तर भारतासाठी पहिलेच. कोनेरू हम्पी, हरिका द्रोणावली, सौम्या स्वामिनाथन, वंतिका अग्रवाल किंवा सविता श्री यांना जमले नाही ते दिव्याने देशासाठी मिळविले आहे. तरुण वय, खांद्यावर भारताचा झेंडा, आंतरराष्ट्रीय स्पर्धांमधील यश, बुद्धिबळ ऑलिम्पियाडच्या सुवर्णपदकामधील योगदान आणि सर्वोच्च किताब मिळवण्याची क्षमता, तिथले स्थान टिकविण्याची जिद्द ही या दोघांची साम्यस्थळे पाहता दिव्याचे अजिंक्यपद ही भारताच्या बुद्धिबळ क्षेत्रातील उज्ज्वल भविष्याचा, समृद्धीचा दीपत्कार ठरतो.

# आमदार मंगेश चव्हाणांवर सायबर गुन्हा दाखल करा

## राष्ट्रवादी महिला काँग्रेस आक्रमक; अप्पर पोलीस अधीक्षकांना दिले निवेदन

महाराष्ट्र जीत

**जिल्हा प्रतिनिधी/ हंसराज भंडारा.**

**भंडारा,** भारतीय जनता पक्षाचे आमदार मंगेश चव्हाण यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते एकनाथ खडसे यांचे जावई डॉ. प्रांजल खेवलकर यांची वैयक्तिक माहिती प्रसारमाध्यमांसमोर उघड केल्याचा आरोप करत, त्यांच्यावर तात्काळ सायबर गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरदचंद्र पवार गट) महिला पदाधिकाऱ्यांनी केली आहे. या मागणीसाठी महिला पदाधिकाऱ्यांच्या एका शिष्टमंडळाने आज भंडारा येथील अप्पर पोलीस अधीक्षक यांना निवेदन सादर केले. पुण्यात नुकत्याच झालेल्या एका कारवाईच्या संदर्भात, आमदार मंगेश चव्हाण यांनी डॉ.खेवलकर यांचे जी-मेल खाते आणि त्यातील खासगी माहिती सार्वजनिक



केली. ही कृती माहिती तंत्रज्ञान कायद्याचे आणि सायबर गुन्हेगारीच्या नियमांचे थेट उल्लंघन करणारी आहे, असे राष्ट्रवादी महिला काँग्रेसने निवेदनात म्हटले आहे. या घटनेमुळे केवळ एका व्यक्तीच्या गोपनीयतेचा भंग झाला नसून, राज्यातील सर्व विरोधी पक्षांतील पदाधिकारी आणि विशेषतः महिला कार्यकर्त्यांमध्ये भीतीचे आणि असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले आहे, अशी भावना महिला पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली. या प्रकरणी प्रशासनाने गांभीर्याने लक्ष घालून कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली.

**निवेदनातील प्रमुख मागण्या:**

आमदार मंगेश चव्हाण यांच्यावर माहिती तंत्रज्ञान कायद्यानुसार सायबर गुन्हा नोंदवण्यात यावा. या प्रकरणाची निःपक्षपातीपणे आणि सखोल चौकशी करण्यात यावी. विरोधी पक्षातील महिला कार्यकर्त्यांच्या सुरक्षेसाठी पोलीस प्रशासनाने ठोस पावले उचलावीत. कायद्याचे राज्य अबाधित राखणे आणि महिलांच्या सुरक्षिततेबद्दल प्रशासनाला जागे करणे हा या निवेदनामागचा मुख्य हेतू असल्याचे शिष्टमंडळाने स्पष्ट केले. यावर तातडीने कारवाई न झाल्यास तीव्र आंदोलन करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. या शिष्टमंडळात राष्ट्रवादी महिला काँग्रेसच्या महिला जिल्हाध्यक्ष राणीताई ढेंगे,एडवोकेट साधनाताई येरने , उर्मिलाताई आगाशे, मिनलताई कारेमोरे, विजयश्रीताई वाघमारे, उषाताई बोंद्रे , सुरेखाताई खराबे , ,उषाताई रामटेके, ,शाहीना खान, शुभमताई मेश्राम , भाविकाताई गजभिये ,अनिताताई मेश्राम, संगीताताई उईके, निरुताई पेंदाम् ,करुणा ताई कुकडे, नीलिमाताई मेश्राम,रक्षाताई शेंडे , योगिताताई सूर्यवंशी , लताताई बावनकुळे, मालुताई कारेमोरे , रीनाताई माटे , लक्षणाताई बिरोले, दुर्गा साखरवाडे ,सीमा पुष्पतोडे यांच्यासह मोठ्या संख्येने महिला पदाधिकारी व कार्यकर्त्या उपस्थित होत्या उपस्थित होते.

# वाशिम शहरातून जाणाऱ्या चौपदरी रस्ता कामाला केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्याकडून मंजुरी

### खासदार संजय देशमुख यांची माहिती

महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रविण पट्टेबहादुर)** आज दि.३० जुलै रोजी दिल्ली येथे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री श्री. नितीनजी गडकरी साहेब यांची भेट घेतली. केंद्र सरकारच्या वतीने केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री श्री. नितीन गडकरी साहेब यांनी दिग्रस शहराजवळील बायपास मार्ग आणि वाशिम शहरातून जाणाऱ्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक 161E च्या चौपदरीकरणास हिरवी झेंडी देण्यात आली आहे.दिग्रस शहरातून पुसदकडून येणाऱ्या राज्य महामार्ग 213 वरून राष्ट्रीय महामार्ग 161A कडे, म्हणजेच आर्णीच्या दिशेने बायपास रस्त्याची गरज दीर्घकाळपासून होती. शहरातील वाहतुकीचा वाढता ताण, अपघातांची शक्यता आणि नागरिकांना होणाऱ्या त्रासामुळे बायपास रस्त्याची मागणी सातत्याने केली जात होती. सदर बायपाससाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (DPR) तयार करण्यात येत आहे आणि या प्रकल्पासाठी निधीची उपलब्धता लवकरच करण्यात येणार आहे.याचप्रमाणे, वाशिम शहरातून जाणारा राष्ट्रीय महामार्ग 161E विशेषतः तामसी फाटा ते धुमका फाटा या 13 किमी अंतराचा रस्ता सध्या दोन पदरी असून, वाशिम शहराची वाढती लोकसंख्या, वाहनांची संख्या आणि शहराची वाढती औद्योगिक गरज लक्षात घेता, हा रस्ता भविष्यासाठी अपुरा ठरत होता. गडकरी साहेबांनी या मार्गाच्या चौपदरीकरणासाठी मंजुरी दिली



असून, लवकरच या कामाला गती मिळणार आहे.या दोन्ही कामांसाठी वेळोवेळी पाठपुरावा करण्यात आला. लोकसभेतही आवाज उठवण्यात आला होता. अखेर सातत्यपूर्ण मागणीला यश आले असून, हे दोन्ही निर्णय वाशिम आणि दिग्रस शहराच्या दृष्टीने ऐतिहासिक ठरणार आहेत.गडकरी साहेबांचे मनःपूर्वक आभार. हा निर्णय लाखो नागरिकांना दिलासा देणारा आहे आणि या भागाच्या विकासाला चालना देणारा ठरेल असे खासदार संजय उत्तमराव देशमुख यांनी केंद्रिय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांना दिलेल्या निवेदनातून अशा व्यक्त केली आहे.

# परिवहन महामंडळाकडून "विशेष पॅकेज टुर्स" चे नियोजन

### दैनंदिन वाहतुकीव्यतिरीक्त जादा बससेवा सुरु



महाराष्ट्र जीत

**जिल्हा प्रतिनिधी / हंसराज भंडारा.**

**भंडारा,** : राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत दैनंदिन वाहतुकीव्यतिरिक्त जादा वाहतूक, विशेष बससेवा तसेच विविध पर्यटनस्थळी, धार्मिक स्थळी नियोजनपूर्वक" पॅकेज टुर्स" वाहतूक करून महामंडळाच्या उत्पन्नात वाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. श्रावण महिन्यात भंडारा विभागाअंतर्गत भंडारा, गोंदिया, साकोली, तुमसर, तिरोडा व पवनी या आगारातून श्रध्दास्थळे, थंड हवेचे पर्यटन स्थळे आणि धार्मिक तिर्थक्षेत्रासाठी विशेष पॅकेज टुर्सचे नियोजन करण्यात आलेले आहे. तसेच श्रावण महिन्यात आंभोरा, रामटेक टेकडी, कोराडी, बाबा सैलानी, पारडशिंगा, शेगाव, शिर्डी, परळी वैजनाथ, चिखलदरा, पंढरपूर, माहूर, तुळजापूर, त्र्यंबकेश्वर, सप्तश्रृंगी, घृष्णेश्वर, अष्टविनायक याव्यतिरीक्त प्रवाशांच्या मागणीनुसार "पॅकेज टुर्स" राबविण्यात येणार आहे. या प्रवाशी पॅकेजमध्ये एका टुरसाठी किमान 40 प्रवाशांची नोंदणी आवश्यक असून बसमधील आसन क्षमतेनुसार टुर्स निश्चित केले जातील. प्रवाशांना विविध सवलतीसह सेवा देण्यात येणार आहे. तरी प्रवासांनी श्रावण महिन्यात या विशेष" पॅकेज टुर्स" चा लाभ घेण्याचे आवाहन राज्य परिवहन महामंडळ भंडारा विभागामार्फत करण्यात आले आहे.

# सरपंच संवाद'मोबाईल ॲपचा वापर करा

### जल जीवन मिशनच्या प्रकल्प संचालकांचे आवाहन

**जिल्हा प्रतिनिधी / हंसराज भंडारा.**

भंडारा, : स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) आणि जल जीवन मिशन यांसारख्या केंद्र व राज्य शासनाच्या महत्वाकांक्षी उपक्रमांमुळे ग्रामीण भागात स्वच्छता व पिण्याच्या पाण्याचा दर्जा उंचावण्यासाठी अनेक पावले उचलली जात आहेत. या पार्श्वभूमीवर सरपंचांच्या नेतृत्वाखाली ग्रामविकास अधिक गतिमान व परिणामकारक करण्यासाठी "सरपंच संवाद" हे मोबाईल अप लाँच करण्यात आले असून, त्याचा लाभ घेण्याचे आवाहन




जल जीवन मिशनचे प्रकल्प संचालक माणिक चव्हाण यांनी भंडारा जिल्ह्यातील सर्व सरपंचांना केले आहे. २२ एप्रिल २०२५ रोजी केंद्रीय जलशक्ती मंत्री सी.आर. पाटील यांच्या हस्ते केंद्र शासनाच्या जलशक्ती मंत्रालयामार्फत "स्वच्छ व सुजल ग्रामसाठी नेतृत्व" या कार्यक्रमात 'सरपंच संवाद मोबाईल अपचे लोकार्पण करण्यात आले. या उपक्रमामध्ये क्वालिटी कौन्सिल ऑफ इंडिया (QCI) या संस्थेच्या सहकार्याने हे अप विकसित करण्यात आले असून, याचा उद्देश ग्रामपंचायतीच्या कारभारात पारदर्शकता,संवाद आणि नविन उपक्रमांची देवाणघेवाण वाढविणे हा आहे. या अपच्या माध्यमातून सरपंच आपल्या गावातील उत्तम कामकाज शेअर करू शकतात, देशभरातील इतर गावांतील यशोगाथा पाहू शकतात, विविध विषयांवरील प्रशिक्षण घेऊ शकतात, बातम्यांची माहिती मिळवू शकतात व ऑनलाईन प्रमाणपत्र मिळवू शकतात. हे अप स्वच्छ भारत मिशन (ग्रामीण) आणि जल जीवन मिशन या दोन्ही अभियानांच्या उद्दिष्टांची पूर्तता करण्यास मदत करणारे प्रभावी डिजिटल साधन आहे.

# उकळीपेन येथील अल्पभूधारक शेतकऱ्याची आत्महत्या.



वाशिम(प्रतिनिधी)येथून जवळच असलेल्या ग्राम उकळीपेन येथील शेतकरी तुकाराम हरिभाऊ घोलप वय ५३ यांनी दिनांक ३० जुलै रोजी कर्जाच्या जाच्याला कंटाळून व सततच्या होणाऱ्या नापीकीला कंटाळून आत्महत्या केली आहे. ते अल्प भूधारक शेतकरी आहेत. त्यांचे संपूर्ण व्यवहार हे शेतीवरच अवलंबून होते.मात्र त्या शेतीमध्ये त्यांना परवडेल असे उत्पन्न होत नव्हते अशातच त्यांचेवर बँक ऑफ महाराष्ट्राचे कर्ज आहे.या कर्जाची परतफेड करणे शक्य होत नसल्यामुळे व वारंवार या कर्जाची परतफेड कशी करावी या विवंचनेत येऊन त्यांनी ही आत्महत्या केली असल्याचे दिसून येत आहे.त्यांच्या पश्चात वयोवृद्ध आई,पत्नी,मुलगा असा परिवार आहे.त्यांच्या परिवाराला शासनाकडून मदत मिळण्याची अपेक्षा कुटुंबांनी व्यक्त केली आहे.

# अठरा पगड बारा बलुतेदार सोशल फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्टच्या पुणे जिल्हा युवक अध्यक्षपदी समीर मुलाणी यांची निवड

महाराष्ट्र जीत

**प्रतिनिधी शाम जगताप**

**सासवड शहर,ता30** : अठरा पगड बारा बलुतेदार सोशल फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्टच्या पुणे जिल्हा युवक अध्यक्षपदी समीर चांदभाई मुलाणी यांची निवड करण्यात आल्याची घोषणा अठरा पगड बारा बलुतेदार सोशल फाउंडेशन चॅरिटेबल ट्रस्टचे महाराष्ट्र राज्य संस्थापक अध्यक्ष आप्पासाहेब भांडवलकर यांनी केली. सासवड येथे ट्रस्टच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ही निवड करण्यात आली. नगरपालिकेचे माजी उपनगराध्यक्ष विजय वढणे यांच्या हस्ते त्यांना नियुक्तीपत्र देण्यात आले व त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी आप्पासाहेब भांडवलकर, उपाध्यक्ष राजेंद्र धोत्रे, सचिव अतुल दादा पवार, सल्लागार मंगेश गायकवाड, खजिनदार इजाज पानसरे, दत्ता सूर्यवंशी, पुरंदर तालुका युवक अध्यक्ष येशू जाधव, सासवड शहर उपाध्यक्ष समिर बागवान, विलास खोमणे, चंद्रकांत भिसे, रूतिक भांडवलकर , सुयेश दळवी,साहिल चौरे, अमीर मुलाणी, जगदीश भोंडे , बंटी धिवार, सोहेल शेख, अन्सार शेख, शाहरुख मुलाणी, अमिर खान आदी उस्थितीत होते.

# अपहरण केलेल्या २ वर्षाच्या मुलीची धाराशीव जिल्हयातुन सुखरुप सुटका, भिक मागण्यासाठी अपहरण केलेल्या टोळीचा पर्दाफाश..

महाराष्ट्र जीत

पुणे शाम जगताप

दिनांक २५/०७/२०२५ रोजी रात्री ०९.०० वा तेदिनांक २६/०७/२०२५ रोजी रात्री ०१.३० वा चेदरम्यान वंडर सिटीझोपडपट्टी, पाण्याचे टाकीजवळ, कात्रज, पुणे या ठिकाणाहून फिर्यादी नामे धनसिंग हनुमंत काळे, वय २५ वर्षे, धंदा मजुरी, रा. वंडरसिटी झोपडपट्टी, पाण्याचे टाकीजवळ, कात्रज, पुणे यांची पिडीत मुलगी वय २ वर्षे हिस कोणीतरी झोपेतुन उचलुन पळवून नेले म्हणून दिले तक्रारीवरुन भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन गुन्हा रजिनंबर ३५३/२०२५, भारतीय न्याय संहीता कलम १३७ (२) अन्वयेदिनांक २६/०७/२०२५ रोजी ०७.५४ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला. दाखल गुन्हा हा गंभीर स्वरुपाचा असल्यामुळे तसेच पिडीत मुलगी ही २ वर्षाची असल्यामुळे अमितेश कुमार पोलीस आयुक्त पुणे शहर यांनी पिडीत मुलीचा तात्काळ शोध घेणेबाबत सर्व अधिकारी यांनासुचनादिलेल्या होत्या. त्याप्रमाणेभारतीविद्यापीठ पोलीस स्टेशनचे वरीष्ठ पोलीसनिरीक्षक राहुल खिलारे यांनी तपास पथकाचे अधिकारी व अंमलदार यांची दोन टिम तयार केल्या. तसेच गुन्हे शाखेकडील अधिकारी व अंमलदार यांची पथके, बाहेरील पोलीस स्टेशनचे अधिकारी व अंमलदार यांची तपास पथके तयार करुन गुन्हयाचे घटनास्थळापासून सी सी टी व्ही फुटेत तपासणी करण्यास सुरवात झाली. कात्रजते पुणे स्टेशन दरम्यानचे रोडवरील आस्थापनांचे एकुण १४० सीसीटीव्ही कॅमेरे चेक केले. त्यामध्ये दोन पुरुष व एक महीला हे एका दुचाकी गाडीवरुन पिडीत मुलीस पुणे रेल्वे स्टेशन मध्ये घेवुन जाताना दिसुन आले. पुणे रेल्वे स्टेशनमधील सीसीटीव्ही कॅमेरांची पाहणी करता त्याठिकाणी पिडीत मुलीस पळवून आणणारे तीन इसमांचे सोबत आणखीन दोन आरोपी असल्याचे दिसुन आले. त्याठिकाणावरुन आरोपींची चेहरे स्पष्ट करुन त्या आरोपींची गोपनिय माहीती घेतली असता आरोपी हे तुळजापुर, जि. धाराशीव या ठिकाणी असल्याची खात्रीशीर माहीती भारती विद्यापीठ तपास पथक व गुन्हे शाखा, युनिट ०२, पुणे यांना मिळाली. प्राप्त असलेली खात्रीशीर माहीती वरिष्ठ अधिकारी यांना दिल्यानंतर मा. वरीष्ठांचे मार्गदर्शनाखाली भारती विद्यापीठ पोलीस स्टेशन तपास पथकाचे अधिकारी पोउपनि मोकाशी व अंमलदार तसेच गुन्हे शाखा युनिट ०२ चे सपोनि आशिष कवठेकर व अंमलदार अशी दोन पथके तुळजापुर, जि. धाराशीव या ठिकाणी जावुन पिडीत मुलीचा व आरोपींचा शोध घेवु लागले. स्थानिक धाराशिव एल सी बी पोलीसांचे मदतीने भारती विद्यापीठ व गुन्हे शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी मेहतीने व कौशल्यपूर्ण पध्दतीने आरोपींचा ठावठिकाणा शोधुन खालील ०३ आरोपी ताब्यातघेतले.

१. सुनिल सिताराम भोसले, वय ५१ वर्षे, धंदा मजुरी, रा. मोतीझारा, तुळजापुर, धाराशीव

२. शंकर उजन्या पवार, वय ५० वर्षे, रा. डिकमाळ, पारधी वस्ती, तुळजापुर, धाराशीव

३. शालुबाई प्रकाश काळे, वय ४५ वर्षे, रा. डिकमाळ, पारधी वस्ती, तुळजापुर, धाराशीव

नमुद आरोपींकडे तपास करता त्यांचेकडे दाखल गुन्ह्यातील पिडीत ०२ वर्षांची मुलगी सुखरुप मिळुन आली. त्यांनतर त्यांचे गुन्ह्यातील इतर ०२ साथीदार याबाबत तपास करता मिळालेल्या माहीतीवरुन खालील ०२ आरोपी देखील ताब्यात घेतले.

४. गणेश बाबु पवार, वय ३५ वर्षे, रा. डिकमाळ, पारधी वस्ती, तुळजापुर, धाराशीव

५. मंगल हरफुल काळे, वय १९ वर्षे, रा. रेंज हिल, खडकी रेल्वे लाईनझोपडपट्टी, खडकी पुणे

नमुद आरोपींना आज दिनांक २९/०७/२०२५ रोजी सकाळी अटक केली असुन झाले तपासामध्ये आरोपींनी पिडीत मुलीस भिक मागण्याकरता तिचे अपहरण केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याप्रमाणे दाखल गुन्ह्यात ची एन एस कलम १३९, ३(५) ची कलम वाढ करुन आरोपींना मा. न्यायालयात हजर केले असता दिनांक ०२/०८/२०२५ पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजुर आहे. दाखल गुन्हयाचा सपोनि स्वप्निल पाटील हे अधिक तपास करीत आहोत.

सदरची कामगिरी अमितेशकुमार पोलीस आयुक्त सा़ो, पुणे शहर, रंजनकुमार शर्मा , पोलीस सह आयुक्त, पुणे शहर, पंकज देशमुख , अपर पोलीस आयुक्त, गुन्हे पुणे, राजेश बनसोडे अपर पोलीस आयुकत, पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर, निखील पिंगळे पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, पुणे शहर, . मिलींद मोहीते, पोलीस उप आयुक्त परिमंडळ २, पुणे शहर राजेंद्र मुळीक, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे २, पुणे शहर राहुल आवारे, सहाय्यक पोलीस आयुक्त स्वारगेट विभाग, पुणे यांचे मार्गदर्शनाखाली भारती विदयापीठ पोलीस स्टेशनकडील वरिष्ठ पोलीस निरीक्षक राहुल खिलारे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) जितेंद्र कदम, गुन्हे शाखा युनिट ०१ पुणेकडील पोलीस निरीक्षक, कुमार घाटगे, तसेच गुन्हे शाखा युनिट ०२ पुणेकडील पोलीस निरीक्षक अंजुम बागवान, सपोनि आशिष कवठेकर, सपोनि अमोल रसाळ, पोउपनि वैभव मगदुम, भारती विद्या पो स्टे कडील सपोनि स्वप्नील पाटील, तपास पथकाचे अधि पोउपनि निलेश मोकाशी, पोलीस अंमलदारमहेश बारवकर, मंगेश पवार, सचिन सरपाले, मंगेश गायकवाड, किरण साबळे, अभिनय चौधरी, मितेश चोरमोले, सागर बोरगे, तुकाराम सुतार, संदीप आगळे, नवनाथ भोसले, निलेश खैरमोडे, तसेच गुन्हे शाखा २ कडील अंमलदार सपोफौ जाधव, पोहवा शंकर कुंभार, पोहवा आबा मोकाशी, पोहवा विजय पवार, पोहवा शंकर नेवसे, पोहवा विनोद चव्हाण, पोहवा संजय आबनावे, पोहवा ओम कुंभार, पोहवा संतोष टकले, पोहवा राहुल शिंदे, मपोहया साधना ताम्हाणे, पोशिनिखिलजाधव, पोशि सद्दाम तांबोळी, पोशि शुभम देसाई, पोशि मयुर भोसले, पोशि निलेश साबळे, पोशि अमित जमदाडे तसेच धाराशिव एल सी बी चे पोहवा समाधान वाघमारे यांच्या पथकाने केली आहे. पोलीस आयुक्त पुणे शहर यांनी सदर प्रशंसनीय कामगीरी बद्दल भारती विद्यापीठ पोलीस स्टेशनचे टीमला १,००,०००/-रु (एक लाख रुपये) व गुन्हे शाखा, पुणे शहर यांना १,००,०००/-रु (एक लाख रुपये) बक्षीस जाहीर केले आहे.

महाराष्ट्र जीत हे दैनिक वृत्तपत्राचे संपादक सागर रामदास अंभोरे यांनी महामाया प्रिंटिंग प्रेस श्रीराम अपार्टमेंट गणेदिवाल लेआउट भाग्य नगर, अमरावती,महाराष्ट्र-४४४६०२ येथे मुद्रीत करुन दैनिक महाराष्ट्र जीत कार्यालय घर क्रमांक ८९, प्रियदर्शनी कॉलनी, बायपास प्रभाग क्रमांक ८ कारंजा, वाशिम, महाराष्ट्र - ४४४१०५. येथे प्रकाशित केले. मो.९९२१०४५१२१ / ९६०४४३०००२ (सर्व वाद कारंजा लाड न्यायालयाअंतर्गत) (याआवृत्तीमधील सर्व जबाबदारी संपादकावर राहिल)

१ २ ३ ४ ५ ६

दैनिक
# महाराष्ट्र जीत
गुरुवार दि. ३१ जुलै २०२५


# अशोक शिनगारे: लोकसेवेचा दीपस्तंभ

## "मिस्टर परफेक्शनिस्ट" अन् माणूस म्हणून अढळ स्थान...!

महाराष्ट्र जीत

माझी अन ठाण्याचे जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांची विधानसभा निवडणूक २०२४ ला मी आचारसंहिता पथक प्रमुख म्हणूनची छोटीसी ओळख.त्यावेळी पाहणी दौऱ्यावर साहेब आले असताना आचारसंहितेच्या गाड्या पाहताच संबंधितांना एक जरब बसावी अशा पद्धतीच्या गाड्या हव्यात यावर त्यांनी

मला दिलेल्या मार्गदर्शनानुसार मी त्या गाड्या त्यांनी दिलेला सूचनाप्रमाणे तयार केल्या आणि त्याचे छायाचित्रे साहेबांना पाठवले. सांगायचा मुद्दा हा की साहेबांचं प्रत्येक गोष्टीवर बारीक लक्ष असायचं आणि निर्णय क्षमता ही फार उत्तम पद्धतीने असल्याकारणाने आम्हाला सदरच्या निवडणुका पार पाडण्यास फार मदत झाली. त्यांची सांगण्याची पद्धत अगदी वेगळी आणि उत्तम होती. त्या दृष्टीने त्यांच्याशी आलेला संबंध आणि ठाणे जिल्हा माहिती अधिकारी कार्यालयाकडून मिळालेला माहितीनुसार साहेबांच्या आजच्या सेवानिवृत्ती दिवशी साहेब जिल्हाधिकारी म्हणून सेवानिवृत्त होत असले तरीसुद्धा त्यांच्या कामाची छाप कायमची राहणार आहे. आज एका अशा प्रशासकाचा सेवानिवृत्तीनिमित्त निरोप समारंभ साजरा होत आहे, ज्यांनी आपल्या कार्याने केवळ प्रशासकीय क्षेत्रातच नव्हे, तर हजारो लोकांच्या हृदयात आदराचे स्थान निर्माण केले आहे. जिल्हाधिकारी श्री.अशोक मंदोदरी अंबादासराव शिनगारे, हे नाव केवळ एक पद नाही, तर ते दूरदृष्टी, कार्यतत्परता, संवेदनशीलता आणि लोककल्याणासाठी सतत धडपडणाऱ्या एका व्यक्तिमत्त्वाचे प्रतीक आहे. आज, दि.31 जुलै 2025 रोजी, ते त्यांच्या गौरवशाली प्रशासकीय सेवेतून निवृत्त होत असताना, त्यांच्या दीर्घ, कार्यक्षम, पारदर्शक आणि लोकहितैषी प्रवासाचा यथोचित सन्मान करणे, हे आपले कर्तव्य आहे.

**अशोक शिनगारे: एक दूरदृष्टीचा प्रशासक**

श्री.अशोक शिनगारे यांचा जन्म दि.1 ऑगस्ट 1965 रोजी झाला. हा केवळ योगायोग नाही की, त्यांचा जन्मदिवस 'महसूल दिन' म्हणूनही साजरा होतो. त्यांच्या जीवनात कृषी क्षेत्राचे सखोल ज्ञान रुजले होते, कारण त्यांनी एम.एस.सी. अग्रीकल्चरमध्ये आपले शिक्षण पूर्ण केले. या शिक्षणाने त्यांना केवळ जमिनीशी जोडले नाही, तर मातीतील प्रत्येक कणाला न्याय देण्याची प्रेरणा दिली. त्यांच्या दूरदृष्टीचा प्रत्यय त्यांच्या प्रत्येक निर्णयातून येत असे. ठाणे जिल्ह्याच्या प्रशासकीय प्रगतीची आधारशिला त्यांच्याच प्रयत्नांनी रचली गेली आहे, हे निश्चितपणे म्हणता येईल.

**गौरवशाली प्रशासकीय प्रवासाची सुरुवात..**

श्री.शिनगारे साहेबांच्या प्रदीर्घ शासकीय सेवेचा प्रवास दि.7 ऑगस्ट 1993 रोजी कृषी विकास अधिकारी म्हणून सुरू झाला. या पदावर त्यांनी दि.30 एप्रिल 1994 पर्यंत काम केले. त्यानंतर महाराष्ट्र लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण होवून दि.23 मार्च 1994 रोजी त्यांची 'उपजिल्हाधिकारी' संवर्गात नियुक्ती झाली. ही त्यांच्या प्रशासकीय कारकिर्दीतील एक महत्त्वाची पायरी होती.

त्यांनी दि.2 मे 1994 ते दि.1 मे 1996 या कालावधीत उपजिल्हाधिकारी परिवीक्षाधीन कालावधी म्हणून कामकाज पाहिले.

त्यानंतर दि.2 मे 1996 ते दि.3 नोव्हेंबर 1999 या कालावधीत त्यांनी हिंगोली, परभणी येथे उपविभागीय अधिकारी पदाची धुरा सांभाळली. या काळात त्यांनी ग्रामीण भागातील समस्या आणि लोकांच्या गरजा जवळून अनुभवल्या, ज्यामुळे त्यांची संवेदनशीलता अधिक वाढली.

**विविध महत्त्वाच्या पदांवरील ठसा**

श्री.शिनगारे साहेबांनी त्यांच्या कारकिर्दीत विविध महत्त्वाच्या पदांवर आपल्या पारदर्शक कार्याचा ठसा उमटवला.

दि.4 नोव्हेंबर 1999 ते 31 जानेवारी 2003 या कालावधीत ते माजी गृहनिर्माण मंत्री श्री. रोहिदास पाटील यांचे खाजगी सचिव होते.

त्यानंतर दि.1 फेब्रुवारी 2003 ते 17 फेब्रुवारी 2003 या काळात ते राज्यमंत्री, गृहे (शहरे) यांचे खाजगी सचिव म्हणूनही कार्यरत होते. या पदांवर काम करताना त्यांना उच्चस्तरीय प्रशासकीय निर्णयप्रक्रियेचा अनुभव मिळाला, ज्यामुळे त्यांची निर्णयक्षमता अधिकच विकसित झाली.

दि.25 एप्रिल 2003 ते 18 जून 2003 या कालावधीत त्यांनी उल्हासनगर नागरी संकुलन, ठाणे येथे उपजिल्हाधिकारी व सक्षम प्राधिकारी या पदाचे काम पाहिले. या काळात त्यांनी उल्हासनगरसारख्या गुंतागुंतीच्या शहरी भागातील समस्या हाताळल्या आणि प्रशासकीय कौशल्याचे उत्तम प्रदर्शन केले.

दि.7 जुलै 2003 रोजी त्यांना निवड श्रेणी उपजिल्हाधिकारी पदाचा लाभ मिळाला, ज्यामुळे त्यांच्या प्रशासकीय कारकिर्दीला आणखी गती मिळाली.

त्यानंतर दि.19 जून 2008 ते 31 जुलै 2012 या कालावधीत त्यांनी अपर जिल्हाधिकारी, मुंबई शहर या पदावर काम केले. मुंबईसारख्या महानगराचा प्रशासकीय अनुभव त्यांच्यासाठी महत्त्वाचा ठरला.

दि.31 जुलै 2012 ते 5 सप्टेंबर 2014 या कालावधीत त्यांनी अपर जिल्हाधिकारी, ठाणे (मुख्यालय जव्हार) या पदावर काम केले, जिथे त्यांना आदिवासी भागातील लोकांच्या अडचणी आणि त्यांच्या विकासासाठी आवश्यक उपाययोजना करण्याची संधी मिळाली.

दि.6 सप्टेंबर 2014 ते 5 एप्रिल 2016 या कालावधीत त्यांनी अपर जिल्हाधिकारी, ठाणे या पदावर काम केले. या काळात ठाणे जिल्ह्याच्या प्रशासकीय यंत्रणेत त्यांनी अनेक सुधारणा घडवून आणल्या.

दि.6 एप्रिल 2016 ते 25 सप्टेंबर 2016 या कालावधीत त्यांनी अध्यक्ष, विभागीय जाती प्रमाणपत्र पडताळणी समिती, कोकण भवन, नवी मुंबई येथेही आपली सेवा बजावली, जिथे त्यांनी समाजातील वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

**भारतीय प्रशासकीय सेवेत पदोन्नती आणि सर्वोच्च पदांवर कार्य**

त्यांच्या अथक परिश्रमाचे आणि प्रामाणिक कार्याचे फळ म्हणून, भारतीय प्रशासकीय सेवेत त्यांची पदोन्नती झाली. दि.26 सप्टेंबर 2016 ते 30 मे 2018 या कालावधीत त्यांनी नांदेड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम पाहिले. जिल्हा परिषदेच्या कारभारात त्यांनी पारदर्शकता आणली आणि ग्रामीण विकासाला गती दिली.

दि.31 मे 2018 ते 8 सप्टेंबर 2020 या कालावधीत त्यांनी सह व्यवस्थापकीय संचालक, सिडको, नवी मुंबई या पदाचा कार्यभार सांभाळला. सिडकोसारख्या मोठ्या विकास प्राधिकरणात काम करताना, त्यांनी शहरी नियोजनात आणि पायाभूत सुविधांच्या विकासात मोलाचे योगदान दिले.

दि.9 सप्टेंबर 2020 ते 30 सप्टेंबर 2022 या कालावधीत त्यांनी सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई म्हणून काम पाहिले. पर्यावरणाच्या संरक्षणासाठी आणि प्रदूषणावर नियंत्रण मिळवण्यासाठी त्यांनी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले. दि.30 सप्टेंबर 2022 रोजी त्यांनी ठाणे जिल्हाधिकारी म्हणून तत्कालीन जिल्हाधिकारी राजेश नार्वेकर यांच्याकडून पदभार स्वीकारला. ठाणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी म्हणून त्यांची कारकीर्द ही त्यांच्या प्रशासकीय प्रवासातील सुवर्णक्षण ठरली. त्यांनी ठाणे जिल्ह्याला प्रशासकीय शिस्त आणि विकासाच्या वाटेवर आणले. आणि आज, दि.31 जुलै 2025 रोजी ते सेवानिवृत्त होत आहेत.

**जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या कार्यकाळातील प्रमुख उपलब्धी**

जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांच्या कार्यकाळात ठाणे जिल्ह्यात अनेक महत्त्वाचे बदल आणि विकासकामे झाली, ज्यामुळे जिल्ह्याच्या प्रगतीला गती मिळाली. त्यांच्या कार्यकाळातील प्रमुख उपलब्धी:


मेट्रो कारशेडसाठी भूसंपादन: मेट्रो कारशेडसाठी जमिनीचे यशस्वी संपादन केले, ज्यामुळे प्रकल्पाचा खर्च वाढला नाही आणि 20 लाखांहून अधिक प्रवाशांना सुलभ प्रवासाचा मार्ग मोकळा झाला.

मुंबई मेट्रो मार्गिका क्र.4, 4अ, 10 व 11 या मेट्रो मार्गिकांच्या एकात्मिक कारशेड डेपोकरिता मौजे मोघरपाडा येथील स.न.30 मधील 174.01 हेक्टर आर क्षेत्राचा ताबा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास देण्यात आला.

मेट्रो कारशेड क्र.7अ व 9 च्या कारशेडकरिता मौजे डोंगरी येथील 59.79 हेक्टर आर क्षेत्राचा आगावू ताबा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास देण्यात आला.

मुंबई मेट्रो 12 कल्याण-तळोजा डेपोकरिता मौजे निळजे येथील 48.61 हेक्टर आर क्षेत्राचा आगावू ताबा मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास देण्यात आला.

बुलेट ट्रेन प्रकल्प: ठाणे जिल्ह्यातून जाणाऱ्या मुंबई-अहमदाबाद बुलेट ट्रेन प्रकल्पासाठी भूसंपादन प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्याची त्यांनी



सक्रियपणे देखरेख केली. रेल्वे पायाभूत सुविधा विस्तार: भारतीय रेल्वेच्या अंतर्गत जिल्ह्यात नवीन रेल्वे लाईन्स जोडण्यास पाठिंबा दिला, ज्यामुळे कनेक्टिव्हिटी आणि सेवा सुधारल्या.

ईस्टर्न फ्रीवे विस्तार: ईस्टर्न फ्री-वेच्या विस्तार कामावर त्यांनी लक्ष ठेवले, ज्यामुळे प्रदेशातील रस्ते जोडणी अधिक चांगली झाली.

मेट्रो लाईन अंमलबजावणी: जिल्ह्यातून जाणाऱ्या मेट्रो लाईन्सच्या अंमलबजावणीतील प्रमुख अडचणी त्यांनी दूर केल्या.

किनारी रस्ता (कोस्टल रोड) आणि कॉरिडॉर प्रकल्प: कोस्टल रोड आणि अनेक शहरी कॉरिडॉरसह मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांच्या प्रगतीसाठी त्यांनी सुलभता आणली.

नवीन सिव्हिल हॉस्पिटल: ठाण्यात नवीन सिव्हिल हॉस्पिटलच्या बांधकामाला गती देण्यासाठी त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली, जे आता पूर्णत्वाकडे आहे.

विकसित भारत संकल्प यात्रा: जिल्ह्यात विकसित भारत संकल्प यात्रेच्या माध्यमातून केंद्र शासनाच्या विविध योजनांचा लाभ 81 हजार 44 नागरिकांना मिळाला.

शासन आपल्या दारी: राज्य शासनाच्या शासन आपल्या दारी या विशेष मोहिमेच्या माध्यमातून ठाणे जिल्ह्यातील 45 लाख 42 हजार 673 नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळाला.

नमो महारोजगार मेळावा: नमो महारोजगार मेळाव्याकरिता 66 हजार 226 इच्छुकांनी नोंदणी केली होती. त्यातील 39 हजार 625 जणांनी मुलाखती दिल्या. त्यानुसार जिल्ह्यातील 17 हजार 519 उमेदवारांना त्याच दिवशी नोकरी देण्यात आली.

मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजना: ठाणे जिल्ह्यातील पात्र महिलांना राज्य शासनाच्या मुख्यमंत्री - माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ देण्यात आला.

दुर्गम भागात प्रमाणपत्र शिबिरे: दुर्गम आणि वंचित भागांतील रहिवाशांना आवश्यक प्रमाणपत्रे देण्यासाठी मोबाईल शिबिरे सुरू केली आणि त्यांना प्रोत्साहन दिले.

निर्यात वाढ: विशेषतः क्षेत्रांनुसार केलेल्या हस्तक्षेपांमुळे जिल्ह्याची निर्यात उलाढाल रु.45 हजार कोटींवरून रु.53 हजार कोटींपर्यंत वाढवण्यात त्यांनी मोलाची भूमिका बजावली.

शांततापूर्ण निवडणुका: श्री.शिनगारे यांच्या कार्यकाळात लोकसभा आणि विधानसभा निवडणुका शांततापूर्ण वातावरणात पार पडल्या. या निवडणुकांमध्ये कोणत्याही अनुचित घटना घडू नये याची त्यांनी खात्री केली.

महत्त्वाच्या व्यक्तींच्या भेटींचे व्यवस्थापन: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या भेटींसह अनेक उच्च-स्तरीय भेटींचे समन्वय साधला, ज्यामुळे नियोजन आणि अंमलबजावणी निर्दोष झाली.

ठाणे-बोरिवली बोगदा प्रकल्प: ठाणे-बोरिवली भूमिगत बोगदा प्रकल्पाला गती दिली, ज्यामुळे प्रवासाचा वेळ लक्षणीयरीत्या कमी होण्याची अपेक्षा आहे.

महासंस्कृती महोत्सव: जिल्ह्यात दि.26 ते 30 जानेवारी 2024 या कालावधीत महासंस्कृती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. या महोत्सवाच्या माध्यमातून नागरिकांना महाराष्ट्रातील पर्यटन, लोककला, कोकणी कला आणि हस्तकला तसेच छत्रपती शिवाजी महाराजांच्या वैभवशाली ठेव असलेल्या किल्ल्यांची माहिती देण्यात आली.

नागरिक समन्वय: नागरी समस्या प्रभावीपणे सोडवण्यासाठी नगर परिषदा आणि महानगरपालिकांशी श्री.शिनगारे यांनी जवळून समन्वय साधला.

जिल्हा नियोजन समिती (DPC) मार्फत निधी: जिल्हा नियोजन समिती (DPC) मार्फत विविध विभागांसाठी विकास निधी सक्रियपणे एकत्रित केला आणि वितरित केला.

स्थानिक उद्योजकांना प्रोत्साहन: जिल्ह्यातील स्थानिक उद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी विविध कंपन्यांसोबत MoU करण्यात आले व त्या माध्यमातून रोजगार निर्मिती करण्यात यशस्वी ठरले.

महानाट्य शिवराज्याभिषेक: छत्रपती शिवाजी महाराजांच्या 350 व्या राज्याभिषेक सोहळ्यानिमित्त जिल्ह्यात "महानाट्य शिवराज्याभिषेक" सादर करण्यात आले. या महानाट्याकरिता दररोज साधारण 9 ते 10 हजार नागरिकांची उपस्थिती होती.

जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांना त्यांच्या या संपूर्ण कारकिर्दीत ठाणे जिल्ह्यातील प्रसारमाध्यम प्रतिनिधींनीदेखील अत्यंत मोलाची साथ दिली. प्रशासन अन् प्रसारमाध्यमे या दोन घटकांच्या सांघिक सहकार्याने ते सकारात्मकतेने व गतिमानाने कामकाज करू शकले.

**"मिस्टर परफेक्शनिस्ट": एक उपाधी नव्हे, तर जीवनशैली**

शिनगारे साहेबांच्या एकूण 32 वर्षांच्या शासकीय सेवेच्या कारकिर्दीत त्यांना खऱ्या अर्थाने "मिस्टर परफेक्शनिस्ट" ही उपाधी प्राप्त झाली आहे. ही उपाधी त्यांना केवळ शासकीय कारकिर्दीतच नव्हे तर त्यांच्या वैयक्तिक आणि सामाजिक जीवनालाही तंतोतंत लागू होते. कोणत्याही विषयाचा अचूक आणि सखोल अभ्यास, कोणताही विषय झटकन समजून घेवून त्यावर अतिशय संतुलित (BALANCED) निर्णय घेणे, कितीही तणावग्रस्त परिस्थिती असली तरी शांत राहणे आणि समोरच्या व्यक्तीचे मन समजून घेणे, त्या व्यक्तीला न दुखावता त्याला मदत करणे या स्वभाव वैशिष्ट्यांमुळे शिनगारे साहेब तळागाळातील सामान्य व्यक्तीपासून ते सर्वोच्च पदावरील व्यक्तींच्या मनात आदराची जागा निर्माण करू शकले. त्यांच्या या गुणांमुळेच ते फक्त एक अधिकारी नव्हते, तर एक संवेदनशील, प्रेमळ आणि जिव्हाळ्याचे संबंध जपणारे व्यक्तिमत्व होते. आम्हा अधिकाऱ्यांसाठी ते नेहमीच एका मोठ्या बंधूंच्या भूमिकेतून एक आदर्श मार्गदर्शक ठरले. त्यांनी केलेले मार्गदर्शन आम्हा सर्वांसाठीच नेहमी पथदर्शी ठरले आहे, ज्यामुळे आमच्यात प्रशासकीय शिस्त, दैनंदिन कामात गतिमानता, गुणवत्तापूर्ण कामकाज, प्रामाणिकपणा, कर्तव्यदक्षता आणि वक्तशीरपणा असे सकारात्मक बदल घडले.

**एक यशस्वी 'कप्तान' आणि लोकसेवेचा आदर्श**

"TRUE LEADERS SPEAK WITH ACTION" या उक्तीप्रमाणे अशोक शिनगारे सर खरोखरीच प्रशासनातील एक लोकप्रिय आणि यशस्वी 'कप्तान' ठरले आहेत. त्यांच्या प्रशासकीय नेतृत्वाखाली ठाणे जिल्हा प्रशासनाने गुणवत्तापूर्ण प्रशासकीय कामकाज करण्यात यशाचा टप्पा गाठला. महत्त्वाचे म्हणजे, त्यांच्या सहवासात अनेक अधिकारी घडले. लोकसेवेचा वसा घेवून काम कसे करावे, याचा आदर्श वस्तुपाठच त्यांनी घालून दिला. वरिष्ठांचा सन्मान राखून, सर्वांना सोबत घेवून लोकहिताची कामे यशस्वीपणे मार्गी लावण्यात त्यांचे कौशल्य या ठाणे जिल्ह्याने पावलोपावली अनुभवले. सरांनी, आम्हाला दिलेली लोकसेवेची ही शिकवण आम्ही यापुढेही अशीच सुरु ठेवण्यासाठी कटिबद्ध राहू. हीच खरी आजच्या दिवशी त्यांना दिलेली गुरुदक्षिणा असेल.

श्री. शिनगारे साहेब केवळ एक उत्तम प्रशासकच नव्हते, तर ते एक उत्तम वक्ता आणि एक उत्तम व्यक्ती देखील होते. त्यांची भाषणे नेहमीच प्रेरणादायी असत, कारण ती केवळ शब्दांची नसते, तर त्यात अनुभवांचे, संवेदनशीलतेचे आणि लोककल्याणाच्या भावनेचे प्रतिबिंब असे.

**कुटुंबवत्सल व्यक्ती आणि माणूस म्हणून अढळ स्थान**

आदरणीय अशोक शिनगारे साहेबांमध्ये आम्ही सतत जनसेवेसाठी धडपडणारा जसा प्रशासक पाहिला, तसाच त्यांच्यात एक कुटुंबवत्सल, प्रेमळ, हळवा, मेहनती, मितभाषी कुटुंबप्रमुखही पाहिला. ही गोष्ट निश्चित आहे की, जो आपल्या कुटुंबाची सर्वार्थाने काळजी घेतो, आपल्या कुटुंबातील व्यक्तींचा आदर राखतो, ती व्यक्ती आपल्या प्रशासकीय सेवेतही त्याच पद्धतीने आपल्या सहकाऱ्यांची, संस्थेची, व्यवस्थेची मनापासून काळजी घेतो. आणि म्हणूनच अशी व्यक्ती सर्वांच्या मनात आपले अढळ स्थान प्राप्त करते.

जिल्हाधिकारी अशोक शिनगारे या 'माणसा'ने त्यांच्यातील माणुसकीने, आपल्या कर्तृत्वाने व गोड वागणुकीने असेच अढळ स्थान तुम्हा-आम्हा सर्वांच्याच मनात निर्विवादपणे मिळविले आहे. त्यांच्या निवृत्तीप्रसंगी, ठाणे जिल्ह्याचे भूषण डॉ.काशिनाथ घाणेकर नाट्यगृह त्यांच्याविषयीच्या प्रेम आणि आदराखातर राज्याचे संवेदनशील उपमुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे साहेब, वन मंत्री मा. गणेश नाईक साहेब, पर्यटन मंत्री मा. शंभूराज देसाई साहेब, परिवहन मंत्री मा. प्रताप सरनाईक साहेब, माननीय लोकसभा सदस्य डॉ. श्रीकांत शिंदे, नरेश म्हस्के, सुरेश म्हात्रे, विधानपरिषद सदस्य निरंजन डावखरे, ज्ञानेश्वर म्हात्रे, विधानसभा सदस्य जितेंद्र आव्हाड, रविंद्र चव्हाण, किसन कथोरे, दौलत दरोडा, श्रीमती मंदा म्हात्रे, संजय केळकर, डॉ. बालाजी किणीकर, कुमार आयलानी, शांताराम मोरे, महेश चौघुले, नरेंद्र मेहता, विश्वनाथ भोईर, रईस शेख, राजेश मोरे, श्रीमती सुलभा गायकवाड आणि कोकण विभागाचे विभागीय आयुक्त डॉ. विजय सुर्यवंशी साहेब, विविध क्षेत्रातील अन्य मान्यवर, ठाणे जिल्हा प्रशासनातील सर्व शासकीय विभागातील अधिकारी-कर्मचारी, मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

त्यांना पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा! शिनगारे साहेबांच्या या प्रदीर्घ, यशस्वी आणि जनहितैषी प्रशासकीय सेवेबद्दल त्यांना आम्ही सर्वजण मनःपूर्वक धन्यवाद देतो आणि त्यांचे मनस्वी अभिनंदनही करतो. शिनगारे साहेबांना त्यांच्या सेवानिवृत्तीनंतर आरोग्यदायी असे दीर्घायुष्य लाभो, त्यांच्या सर्व इच्छा पूर्ण होवोत, अशा आमच्या हार्दिक सदिच्छा...! त्यांच्या पुढील वाटचालीस (Next Innings) खूप खूप शुभेच्छा...!

**सुनील सुंदराबाई धाऊ झळके**

# भंडारा पोलीस पाटील भरतीतील गैरव्यवहारावर शिक्कामोर्तब; मॅट कोर्टाने संपूर्ण भरती प्रक्रिया केली रद्द.

**उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर मॅटचा महत्त्वपूर्ण निर्णय; अन्यायग्रस्त उमेदवारांच्या न्यायालयीन लढ्याला मोठे यश.**

महाराष्ट्र जीत

**जिल्हा प्रतिनिधी / भंडारा.**

**भंडारा,:-** भंडारा उपविभागातील ४९ गावांसाठी झालेल्या वादग्रस्त पोलीस पाटील पदभरती प्रक्रियेत अखेर गैरव्यवहार झाल्याचे सिद्ध झाले असून, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने (मॅट) संपूर्ण भरती प्रक्रियाच रद्द करण्याचा ऐतिहासिक निर्णय दिला आहे. निवड समितीत हस्तक्षेप झाल्याचा ठपका ठेवत मॅटने हा निकाल दिल्यामुळे, लेखी परीक्षेत उच्चतम गुण मिळवूनही डावलल्या गेलेल्या अन्यायग्रस्त उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला आहे.



**प्रकरण असे की,**

दिनांक.१६/३/२०२३ ला ४९ गावासाठी भंडारा उपविभागात पोलिस पाटील पदभरती ची जाहिरात प्रसिद्ध झाली , त्या अनुषाने ४८गावातून विविध आरक्षणातून उमेदवारांनी अर्ज दाखल केले. जाहिरातीतील जाहीरनामा प्रमाणे पदभरती होत नसल्यामुळे भरती प्रक्रिया दरम्यान वरिष्ठांना निवेदन व तक्रारी देण्यात आल्या होत्या . त्यावेळी तत्कालीन जिल्हाधिकारी डॉ.योगेश कुभेजकर यांनी सकारात्मकता दाखवत तक्रारीची दखल घेऊन चौकशी समिती नेमून निष्पक्ष चौकशी करून तत्कालीन सरकारला अहवाल सादर केला. त्यानंतर सरकारने कार्यवाही केली व १)रविंद्र राठोड(उपविभागीय अधिकारी) २) अरविंद हिंगे (तहसीलदार भंडारा )३) नीलिमा रंगारी (तहसीलदार पवनी ) यांना निलंबित करून निवड झालेल्या पोलिस पाटील यांना ४ /७/२०२३ ला कार्यमुक्त करण्यात आले. कालांतराने कार्यमुक्त पोलिस पाटील यांनी मॅट कोर्ट मध्ये जाऊन आह्वान केले त्याठिकाणी राज्यसरकार नी त्यांची बाजू व्यवस्थित न मांडल्यामुळे दिनांक ५/१०/२०२३ ला कार्यमुक्त पोलिस पाटील यांना रुजू आदेश करण्यात आले .त्या आदेशानुसार ते रुजू झाले . ह्या भरती प्रक्रियेत उच्चतम गुण प्राप्त उमेदवारांना डावलून लेखी परीक्षेत कमी गुण असणाऱ्यांना तोंडी परीक्षेत निवड समितीने मर्जीतील गुण देऊन ४८ पैकी ३० उमेदवारवर अन्याय केला त्यामुळे या भरती प्रक्रियेत आर्थिक देवाण घेवाण झाली अशी शंका होती व समाज माध्यमात चर्चा झाली व अन्याय धारक उमेदवार यांनी ५ /१/२०२४ ला उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ येथे अड सुमंत देवपुजारी यांच्यावतीने याचिका दाखल केली .त्यामध्ये मा.न्यायमूर्ती अविनाश घरोटे व मा.न्यायमूर्ती अभय मंत्री याच्या दिनांक २२/४/२०२५ ला भरती प्रक्रियेतील निवड समिती ही चुकीची आहे असा निर्णय देऊन प्रकरण मॅट न्यायालयात वर्ग करून ३ महिन्यात निर्णय द्या असा आदेश करण्यात आला.त्यानंतर मॅट न्यायालयात युक्तिवाद झाला त्यावेळी सुद्धा अड सुमंत देवपुजारी उपस्थित होते त्यांनी भक्कम पने बाजू मांडून पुरावे सादर केले तेव्हा मॅट न्यायालयाने एक पाऊल पुढें टाकून भरती प्रक्रियेत हस्तक्षेप झाल्याचे न्यायमूर्ती विनय जोशी ( मॅट कोर्ट ) यांनी दिनांक २५/७/२०२५ ला निर्णय देत भरतीप्रक्रिया रद्द केली .यामध्ये सरकारी वकील म्हणून अड,. एस. ए . सैनिस यांनी सरकारची बाजू मांडली तर कार्यमुक्त पोलिस पाटील यांच्या वतीने .अड , काकानी, अड,चितळे, अड खापरे, व इतर तसेच अन्यायधारक उमेदवार चे बाजूने अड,सुमंत देवपुजारी यांनी यूक्तिवाद करून न्याय मिळवून दिला . सर्व अन्याय धारक उमेदवारांनी न्यायमूर्ती व अड,देवपुजारी व डॉ.योगेश कुभेजकर ,अंकुश वंजारी. परमानंद मेश्राम, बालू ठवकर ,प्रमोद केसरकर यांचे अभिनंदन व आभार मानले .त्याचप्रमाणे या न्यायालयीन लढा मध्ये ज्यांनी सुवातीपासून सहकार्य केले त्यांचे आभार मानले.यानंतर होणाऱ्या पोलिस पाटील भरती प्रक्रियेत सूक्ष्म लक्ष ठेवून भरती प्रक्रिया पारदर्शक होईल असे मत अंकुश वंजारी (प्रहार जनशक्ती पक्ष जिल्हाप्रमुख भंडारा ) यांनी पत्रकार परिषद मध्ये सांगितले तेव्हा उपस्थित , रोशना प्रदीप मोहरले,लता सुरेंद्र पडोळे,वर्षा संजय चांदेकर , शारदा गणेश बुदे,अंकुश ऋषी पंचबुधे हे उपस्थित होते

# सुराळा येथील जिल्हा परिषद शाळेच्या शालेय व्यवस्थापन समितीच्या अध्यक्ष पदी गोविंद राऊत यांची निवड.

**शालेय व्यवस्थापन समिती नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्यावर भर देणार -राऊत**



महाराष्ट्र जीत

**वाशिम(प्रतिनिधी)** येथून जवळच असलेल्या ग्राम सुराळा जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा सुराळा येथे नुकतीच शालेय व्यवस्थापन समिती निवडणूक ग्राम पंचायत सरपंच पवन मोतीराम राऊत यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. यावेळी पहिली ते आठवी वर्गामधून निवडणूक प्रक्रिया पार पडून सर्व सदस्यांची निवड करण्यात आली त्यानंतर निवडणूक प्रक्रियेचे अध्यक्ष पवन राऊत यांच्या अध्यक्षतेखाली व डीगांबर चौधरी तंटामुक्त समिती अध्यक्ष संजय चौधरी,पोलिस पाटील सुराळा यांच्या निरीक्षणाखाली व जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक समाधान कांबळे यांच्या समक्ष सर्व सदस्य मंडळाकडून जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा सुराळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष पदी गोविंद अशोक राऊत यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. व उपाध्यक्ष पदी सैय्यद सुभान सैय्यद इब्राहिम यांची निवड करण्यात आली व समितीमधे पहिली ते आठवी मधून सदस्य पदासाठी निवड जाहीर करण्यात आली यामध्ये तज्ञ संचालक गोवर्धन राऊत, सदस्य भारत भांबिरे ,सैय्यद गुलजारबी सैय्यद युसुफ ,शारुख पठाण ,सौ. नीता अनिल बिटोडे ,सौ.धम्मपली प्रताप राऊत ,सौ.गंगाबाई पांडुरंग बिटोडे,सौ पूजा विलास राऊत ,शिक्षक सदस्य वासुदेव मुठाळ यांची निवड झाली. यावेळी बोलत असताना नवनिर्वाचित शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गोविंद राऊत यांनी सांगितले की,विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव मिळावा यासाठी शाळेत विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून विद्यार्थ्यांच्या कौशल्यात भर देऊन शाळेला नेहमी सहकार्य करून शिक्षकांच्या माध्यमातून नक्कीच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधणार असल्याचे यावेळी त्यांनी सांगितले.या निवडीचे सर्व गावातून सर्वच स्थरातून अभिनंदन होत आहे .

दैनिक
# महाराष्ट्र जीत
गुरुवार दि. ३१ जुलै २०२५
वाशीम जिल्हा


## वारकरी साहीत्य परिषदेची आढावा बैठक संपन्न .

### मुर्तीजापूर तालुका वारकरी साहीत्य परीषदेसाठी साहेबराव राऊत यांची नियुक्ती .

नकूल उपाध्ये / कारंजा लाडः
वारकरी साहीत्य परिषदेची आढावा बैठक विश्रामगृह अकोला येथे नुकतीच जिल्हा अध्यक्ष हभप शिवशंकर पाटील डिक्कर यांचे प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली .
अकोला जिल्हा वारकरीपरिषद मार्फत विवीध धार्मिक कार्यक्रम आयोजीत होतात. सर्व धार्मिक कार्याचा आढावा घेण्या हेतू बैठकीचे आयोजन होते . यावेळी शेगाव निवासी इंगळे परीवारा कडून वारकरी परिषद द्वारा धार्मीक कार्यात सहभाग देणाऱ्यां पुरुषांना दुपट्टा व महिलांना ब्लाऊजपीस देऊन
अध्यक्ष हभप शिवशंकर पाटील; हभप गजाननराव वैद्य; हभप . पुरुषोत्तम महाराज बोळे गुरुजी यांचे हस्ते सन्मान करण्यात आला . विराहीत निवासी साहेबराव राऊत गुरुजी यांची मुर्तीजापूर तालुका वारकरी परिषदेसाठी सल्लागार म्हणून हभप शिवशंकर पाटील डिक्कर यांनी यावेळी नियुक्ती केली . यावेळी वारकरी परिषदेच्या कार्याचा आढावा घेण्यात आल्याचे साहेबराव राऊत गुरुजी यांनी कळविले आहे .




## सपोनि रमेश जाधवर यांचा पोलिस अधीक्षकांच्या हस्ते सन्मान,

**महाराष्ट्र जीत :- सुभाष खडसे**
**माहूर तालुका प्रतिनिधी**



माहूर तालुक्यातील सिंदखेड पोलिस स्टेशन चे सहाय्यक पोलिस निरीक्षक रमेश जाधवर यांनी 78टक्के वॉरंट निर्गमित मध्ये उत्कृष्ट कौतुकास्पद कामगिरी केल्याबद्दल नांदेड जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांचे हस्ते नुकतेच त्यांना सन्मान करून प्रशस्तीपत्र देऊन गौरवीन्यात आले, पोलिस स्टेशन सिंदखेड येथे माहे जुन 2025महिन्यात 78%टक्के वॉरंट निर्गमित करून उत्कृष्ट कामगिरी केली आहे, त्यांनी अविरत दिलेल्या सेवेचा सन्मान करण्यासाठी नांदेड पोलिस दलाच्या वतीने सपोनि रमेश जाधवर यांचा गौरव करण्यात आला आहे, यावेळी पोलिस विभागातील वरिष्ठ अधिकारी पोलिस कर्मचारी यांची उपस्थिती होती,

## डाक विभागातील कामे 2 ऑगस्टला बंद राहतील

**जिल्हा प्रतिनिधी/ हंसराज भंडारा.**

**भंडारा,** : ग्राहकांच्या हितासाठी व त्यांना अचुक, जलद व ग्राहकाभिमुख सेवा मिळावी याच उद्देशाने डाक विभागाद्वारे पुरविण्यात येणाऱ्या सुविधांमध्ये मोठे बदल घडवून आणण्याचे केंद्र शासनाने ठरविले आहे. त्याकरीता डाक विभागात आयटी 2.0 या संगणकीय प्रणालीची अंमलबजावणी होणार आहे. आयटी 2.0 प्रणालीची अंमलबजावणी 4 ऑगस्ट रोजी नागपूर, भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील सर्व डाकघरात होणार आहे. डाटा ट्रान्सफर ही अत्यंत महत्वाची प्रक्रीया 2 ऑगस्ट रोजी सुरु करण्यात येत असल्यामुळे नागपूर, भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील डाक विभागाशी संबंधीत कामे ही 2 ऑगस्ट रोजी बंद राहणार आहेत. ग्राहकांनी आपले डाक विभागाशी संबंधीत जी काही तातडीची कामे 1 ऑगस्टपर्यंत पूर्ण करुन घ्यावे. सर्व ग्राहकांनी यांची नोंद घ्यावी, असे आवाहन नागपूर ग्रामीण विभागाचे वरिष्ठ डाक अधीक्षक श्रीनिवासा राव यांनी केले आहे.

## सारकिन्ही येथे घाणीचे साम्राज्य पसरले ही बातमी महाराष्ट्रा जित पेपर मध्ये प्रकाशित होताच ग्रामपंचायत प्रशासन लागले कामाला,

महाराष्ट्र जीत








प्रतिनिधी भारत चव्हाण/सारकिन्ही ,,बार्शीटाकळी पंचायत समिती अंतर्गत येत असलेल्या सारकिन्ही गावात संत सेवालाल महाराज , जगदंबा देवी मंदिराजवळील गावात जाणाऱ्या मुख्य रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य पसरले याबाबत 29,, जुलै रोजी महाराष्ट्र जित पेपर मध्ये बातमी प्रकाशित होताच लगेच दुसऱ्या दिवशी सकाळी 10, वाजता ग्रामपंचायत प्रशासनाने जिल्हा परिषद शाळा तसेच अंगणवाडी परिसरातील घाण जेसीबी द्वारे ट्रॅक्टर मध्ये भरून उचलून गावाबाहेर नेऊन फेकत आहे बरेच दिवसापासून सारकिन्ही गावांमध्ये घाणीचे साम्राज्य पसरले होते याकडे ग्रामपंचायत प्रशासनाने बरेच दिवसापासून दुर्लक्ष करीत होते परंतु दिनांक 29, 7, 2025 रोजी ही बातमी महाराष्ट्र जित पेपर मध्ये प्रकाशित होताच 30,7, 2025 रोजी सकाळी च ग्रामपंचायत प्रशासन घाणीचे साम्राज्य दूर स्वच्छता करण्यामागे लागले आहेत याबाबत बातमी महाराष्ट्र जित पेपर मध्ये प्रकाशित झाल्यामुळे सारकिन्ही येतील विद्यार्थी ग्रामस्थ महाराष्ट्र जित पेपर चे खूप खूप मनापासून आभार मानत आहे कारण महाराष्ट्र जित पेपर मध्ये बातमी प्रकाशित झाल्यामुळे सारकिन्ही गावातील अंगणवाडी जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा परिसरातील घाणीचे साम्राज्य दूर करण्याचे काम ग्रामपंचायत प्रशासनाने हाती घेतले आहे काम अंगणवाडी परिसरातील जिल्हा परिषद शाळेजवळील घाणीचे साम्राज्य जेसीबी द्वारे ग्रामपंचायत प्रशासनाने स्वच्छता करण्याचे काम करीत आहेत तसेच मुख्य रस्त्यावर मोठ मोठे डबके साचले असून या रस्त्यावरून बाहेर गावावरून येणाऱ्या पाहुणे मंडळी तसेच सारकिन्ही गावातील ग्रामस्थ मुख्य रस्त्यावरुन मधोमध खड्डे साचलेल्या पाण्यातून येणे जाणे करावे लागत होते तसेच शिक्षणासाठी बाहेर गावाला अंदाजे लहान मोठे १५० विद्यार्थी दररोज चिखलातून व मोठ मोठे पाणयाचे डबक्यातुन येने जाने करत होते सारकिन्ही गावात दुर्गंध पसरली होती अंगणवाडी गावठाण जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा समोर चिखलाचे साम्राज्य पसरले होते पाण्याचे मोठमोठे डबके साचले होते याबाबत,29, जुलै रोजी महाराष्ट्र जित पेपर मध्ये बातमी प्रकाशित होताच लगेच दुसऱ्या दिवशी सकाळी 10 वाजता ग्रामपंचायत प्रशासनाने जेसीबी लावून गावांमधील घाणीचे साम्राज्य दूर करण्याचे काम सुरू केले आहेत यामुळे सारकिन्ही येतील ग्रामस्थ महाराष्ट्र जित पेपरचे खूप खूप मनापासून आभार मानत आहे कारण महाराष्ट्र जित पेपर मुळे गावामध्ये घाणीचे साम्राज्य दूर झाल्याचे ग्रामस्थांमध्ये चर्चा सुरू आहे ग्रामपंचायत प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्यामुळे गावामध्ये आजाराचे प्रमाण वाढण्याची शक्यता होती तसेच ग्रामसेवक आठ ते दहा दिवसानंतर गावात येतात व अकोला येथुन अपडाऊन करीत असल्यामुळे सारकिन्ही येथे मूलभूत सुविधा कडे दुर्लक्ष होत असल्याने गावामध्ये जागोजागी पाण्याचे मोठ मोठे डबके साचले आहे डबक्यातील पाण्याची दुर्गंधी येत असल्यामुळे गावामध्ये आजाराचे प्रमाण वाढण्याची शक्यता झाली होती तसेच जंतुनाशकाची आता पर्यंत गावांमध्ये फवारणी केली नाही त्यामुळे डासांचे प्रमाण खूप वाढले आहे, ग्रामपंचायत प्रशासनाने गावातील चिखल तसेच मुख्य रस्त्यावरील साचलेले घाणपाणीचे डबके यांची व्यवस्था ग्रामपंचायत प्रशासनाने करावी वार्ड क्रमांक दोन या भागामध्ये मुख्य रस्त्यावर चिखलाचे साम्राज्य पसरले असल्याने विद्यार्थी सह ग्रामस्थ वैतागले होते या भागातील तसेच सारकिन्ही गावातील विद्यार्थ्यांना शाळेला जायला हाच एकच मुख्य रस्ता असल्याने विद्यार्थ्यांना ग्रामस्थांना चिखलातून कसे जावे हा प्रश्न त्यांच्यासमोर निर्माण झाला आहे या परिसरातील नाल्याचे व बांधकाम केले नसल्याने सांडपाणी व पावसाचे पाणी रस्त्यावर साचत आहे विद्यार्थी सह ग्रामस्थांना चिखलातून मार्ग शोधून ये जा करावी लागत होती याकडे ग्रामपंचायतचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांकडून होत होती परंतु 29, जुलै रोजी महाराष्ट्र जित पेपर मध्ये बातमी प्रकाशित होताच ग्रामपंचायत प्रशासन लागले दुसऱ्या दिवशी सकाळी 10 वाजता कामाला तरी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गावाकडे लक्ष देऊन रस्त्यावर साचलेले चिखल व मोठमोठे पाण्याचे डबके साचलेले यांची व्यवस्था करण्यात यावी अशी ग्रामस्थांची व विद्यार्थ्यांची मागणी होत आहे

## लोकनेते रामशेठ ठाकूर महाविद्यालयात आज महाविद्यालय विकास समितीची बैठक संपन्न

महाराष्ट्र जीत
**प्रतिनिधी/अमोल टोपले**




**मोखाडा**: येथील रयत शिक्षण संस्थेचे, लोकनेते रामशेठ ठाकूर महाविद्यालयात आज महाविद्यालय विकास समिती बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्या निमित्ताने महाविद्यालयाचे विकास समितीचे प्रमुख व रयत शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ मॅनेजिंग कौन्सिल सदस्य खा. रामशेठ ठाकूर साहेब व व रयत शिक्षण संस्थेचे व्हाईस चेअरमन अड.भगीरथ काका शिंदे साहेब तसेच पालघर जिल्हा परिषद अध्यक्ष श्री. प्रकाश निकम साहेब, संस्थेचे माध्यमिक शिक्षण विभागाचे सह सचिव श्री. बंडू पवार साहेब व संस्थेचे इतर पदाधिकारी, आश्रम शाळेचे प्रकल्प अधिकारी, प्र. प्राचार्य डॉ.ए. एन. चांदोरे, उपप्राचार्य डॉ. एस. जी. मेंगाळ व महाविद्यालयाचा सर्व स्टाफ तसेच विकास समितीचे सदस्य व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वप्रथम महाविद्यालय विकास समितीचे प्रमुख आदरणीय खा. रामशेठ ठाकूर साहेब यांनी महाविद्यालयाची पाहणी केली. त्यानंतर महाविद्यालयामध्ये चालू असलेल्या रंगमंचाचे व प्रशासकीय इमारतीतील दुसरा मजल्यावरील वेगवेगळ्या विकासात्मक कामांचे निरीक्षण करून पुढील सूचना दिल्या. महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग यांच्या वतीने तारपा नृत्याचे विशेष आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना विभाग व वनस्पतीशास्त्र विभागाच्या वतीने वृक्षारोपण करण्यात आले. या आदिवासी भागातील विद्यार्थी पुढे जावा त्याच्या शिक्षणामध्ये सोयी सुविधा निर्माण व्हाव्यात. या दृष्टीने विचार करून मा. श्री. रामशेठ ठाकूर साहेब यांनी आज महाविद्यालय विकास व आर्टिफिशियल इंटेलिजन्स करिता 30 लाख रुपयाची देणगी दिली आहे त्याबद्दल संस्थेचे व्हाईस चेअरमन अड. भगीरथ काका शिंदे व महाविद्यालय विकास समितीचे सर्व सदस्य यांनी विशेष आभार व्यक्त केले. तसेच या बैठकीमध्ये आदिवासी भागामध्ये आदरणीय रामशेठ ठाकूर साहेब यांचे विशेष शैक्षणिक योगदानाबद्दल महाविद्यालयाच्या विकास समितीने त्यांना पद्मश्री पुरस्कार मिळावा यासाठी सर्वानुमते या बैठकीमध्ये एकमताने ठराव मंजूर करण्यात आला व सदर प्रस्ताव महाविद्यालयाच्या वतीने संस्था पातळीवर पुढील कार्यवाहीसाठी पाठवण्यात येणार आहे. महाविद्यालयामध्ये चालू असलेले वेगवेगळे उपक्रम व पुढील वाटचालीस महाविद्यालयाचे विकास समितीचे प्रमुख व अड. भगीरथ काका शिंदे साहेब यांनी शुभेच्छा दिल्या. या बैठकीचे आभार प्रा. एस. ए. फुंदे यांनी मानले.

## भाजपाचे माजी तालुका उपाध्यक्षाचा शिवसेना ऊ.बा.ठा.त जाहीर प्रवेश.

महाराष्ट्र जीत

वाशिम(प्रतिनिधी) रिसोड तालुक्यातील भारतीय जनता पार्टीच्या शेतकरी विरोधी भुमीकेला व भाजप मधील स्थानिक नेतृत्वाच्या कुरघोडीच्या राजकारणाला कंटाळून रिसोड तालुक्यातील किसान आघाडीचे माजी तालुका उपाध्यक्ष गजानन लक्ष्मण बाजड याचा पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे शेतकऱ्याच्या प्रती असलेली प्रचंड संवेदनशीलता व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारधारेने प्रेरित होऊन रिसोड विधान सभेचे सहसंपर्कप्रमुख विश्वनाथ सानप व उपजिल्हाप्रमुख डॉ.चंद्रशेखर देशमुख यांच्या मार्गदर्शनात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या रिसोड येथील कार्यालयात उपस्थित राहून दि 30 जुलैला जाहीर पक्ष प्रवेश घेतला यावेळेस तालुकाप्रमुख नारायण आरू, तालुका संघटक आनंद कुलाळ, युवासेना उपजिल्हाप्रमुख गणेश देशमुख, युवासेना तालुकाप्रमुख गजानन सानप, केनवड सर्कल प्रमुख सुरेश बाजड आदी पदाधीकारी व शिवसैनिक उपस्थित होते. सदर प्रवेश घडविण्याबाबत रिसोड तालुका समन्वयक घनश्याम मापारी यांनी महत्त्वाची भुमीका बजावली. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे विचाराने जनसामान्यांचे काम करून पक्ष संघटन मजबूत करण्याचे काम आगामी काळात करू असे गजानन बाजड यांनी पक्षप्रवेशावेळी सद्भभावना व्यक्त केल्या असल्याची माहीती प्रसिद्धी पत्राद्वारे दिली.




## महीला आर्थिक विकास महामंडळाच्या सीएमआरसी महीलां कर्मचाऱ्यांचे धरणे आंदोलन.

### प्रलंबित विविध मागण्यांसाठी केले आंदोलन | डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेने दिला पाठींबा

महाराष्ट्र जीत





**वाशीम(प्रविण पट्टेबहादुर)** महीला आर्थिक विकास महामंडळाच्या महीलांचे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दि.३० जुलै २०२५ रोजी एक दिवसीय धरणे आंदोलन करण्यात आले. महीला आर्थिक विकास महामंडळाच्या महीलांच्या मागण्या रास्त असल्याने या एक दिवसीय धरणे आंदोलनाला डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान यांनी जाहीर पाठिंबा दिला आहे. यावेळी समाज कल्याण पदवीधर संघटनेचे प्रविण पट्टेबहादूर, शेतकरी युवा नेते अरुण शेळके पाटील यांची देखील उपस्थिती होती.

यावेळी महीला आर्थिक विकास महामंडळ कम्युनिटी मॅनेजड् रिसोर्स सेंटर कंत्राटी कर्मचारी संघ या संघटनेचे वतीने माविमं मालेगाव चे व्यवस्थापक शरद कांबळे,गोरे सर,प्रदिप तायडे,लत्ता इंगळे, संतोष मुखमाले, संघटना उपाध्यक्ष सुजाता तोंडारे,सहयोगीनी पुष्पा गवळी,मुनी नंदावले,प्रणिता भगत,सिमा बोरकर,भारती चक्रनाराण,सिमा पाचपिल्ले,जया गायकवाड,ज्योती इढोळे , उज्वला पट्टेबहादूर ,प्रज्ञा सरकटे यांचेसह बहुसंख्येने महीलांची धरणे आंदोलनाला उपस्थिती होती.निवेदनात प्रशासकीय खर्चाकरीता २५ लाख रुपये उपलब्ध करून देणे,ही.आर.पी.यांना उमेद प्रमाणे ६००० रुपये मासिक मानधन,माविमं स्थापीत प्रत्येक गटाला ३०००० रूपये फीरता निधी देणे,माविमं गटाला ७ टक्के व्याजदराने कर्ज उपलब्ध करून देणे,

इत्यादी मागण्यांचे निवेदन जिल्हाधिकारी यांचे मार्फत मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई यांना देण्यात आले आहे.निवेदनात असे नमूद केले आहे की,महीला आर्थिक विकास महामंडळ हे उमेद प्रमाणेच संपूर्ण महाराष्ट्रात काम करत असून.शहरी व ग्रामीण भागातील महीलांच्या उन्नती साठी विकासात्मक कार्यात मोलाचे सहकार्य करीत आहेत.शिवाय यामध्ये व्यवस्थापक, लेखापाल,सहयोगीनी,सि. आर.पी.व इतर कर्मचारी ,महीला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून कामे करत आहेत.परंतु शासन अंगीकृत असणार्या माविमं ला मात्र दुजा भाव दिल्या जात आहे. म्हणून शासनाने महीला आर्थिक विकास महामंडळाच्या कर्मचारी,व यामध्ये काम करणाऱ्या महीलांना योग्य न्याय द्यावा अशी मागणी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर एक दिवसीय धरणे आंदोलन करून व निवेदन देऊन मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई यांना करण्यात आली आहे.प्रसंगी या एक दिवसीय धरणे आंदोलनात जिल्ह्यातील महीलांची बहूसंख्येने उपस्थिती होती.यावेळी माविमंचे मालेगाव व्यवस्थापक शरद कांबळे यांनी महीला आर्थिक विकास महामंडळाच्या समस्या सविस्तर पुणे मनोगत व्यक्त करतांना सांगितल्या आहेत.याचवेळी डॉ बाबासाहेब आंबेडकर पदवीधर संघटनेचे अध्यक्ष राजकुमार पडघान यांनी संघटनेचा जाहीर पाठिंबा देवून माविमंच्या पाठीशी खंबीरपणे पाठीशी उभे राहू.असे बोलताना सांगितले आहे.या माविमंच्या एकदिवसीय धरणे आंदोलनासाठी जिल्ह्यातील महीलांची बहूसंख्येने उपस्थिती होती.

## वाडा नगरपंचायत हद्दीतील दगड खदाण बंद करण्याबाबत दिले निवेदन

महाराष्ट्र जीत






वाडाः- वाडा शहरात दि. 29/07/2025 रोजी मा.उपविभागीय अधिकारी वाडा, मा. तहसीलदार वाडा, मा. नगरपंचायत वाडा, मा. पोलीस निरीक्षक वाडा यांना मे. जयनम इंटरप्राइयझेस ही दगड खदाण त्वरित बंद करावी म्हणून वाडा कवटे पाडा येथील ग्रामस्थांनी निवेदन दिले. वाडा नगरपंचायत हद्दीतील कवटेपाडा येथील बांबरे वस्ती लगत असलेल्या जयनम इंटरप्रायझेस ही व्यवसायिक खदाण सुरु आहे, या खदाणीमध्ये दररोज बोअर ब्लास्टिंग केली जाते या ब्लास्टिंगचा दणका पाड्यातील घरांना बसतो त्यामुळे शेजारील घरांना दणके बसून तडे गेली आहेत, तसेच बोअर ब्लास्ट करताना उडालेले दगड हे घरांच्या पत्र्यावर तसेच घराच्या परिसरात येऊन पडतात त्यामुळे जयनम इंटरप्रायझेस या खदाणीमुळे कोणतीही वित्तहानी किंवा जीवितहानी होण्याची दाट शक्यता आहे. या खदाणीमुळे आजूबाजूच्या परिसरातील जनजीवनावर त्याचा विपरीत परिणाम होतो तसेच या परिसरातील ग्रामस्थांना असंख्य मरण यातना सहन कराव्या लागतात. जयनम इंटरप्रायझेस या खादाणीचे नियमित होत असलेल्या बोअर ब्लास्टिंग मुळे या परिसरातील घरे कोसळून मुळाबाळांसहित कुटुंब उध्वस्त होऊ शकतात असे सुद्धा निवेदनात नमूद केले आहे. वाडा नगरपंचायत हद्दीतील कवटेपाडा येथील बांबरे वस्ती ही पिढ्यानंपिढ्या वसलेली आहे आणि जयनम इंटरप्रायझेस ही दगड खदाण या वस्ती पासून अगदी 50 मीटर अंतरावरआहे तरी सुद्धा प्रशासने या खदाणीला कोणत्या अटी शर्ती वर परवानगी दिली आहे हा सुद्धा शंकेचा विषय आहे. का प्रशासन हे सुद्धा आमच्या आदिवासीच्या जीवावर उठले आहे असे सुद्धा निवेदनात नमूद केले आहे. तरी प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने दखल घेऊन मे. जयनम इंटरप्रायझेस ही दगड खदाण त्वरित बंद करा अन्यथा आमच्या जिवाच्या सुरक्षेसाठी ना इलाजस्ताव तहसीलदार कार्यालया समोर सर्व ग्रामस्थांनी आंदोलनाचा इशारा दिला आहे.

निवेदन देताना अरुण खुलात, प्रकाश बांबरे, मोतीराम बातरा, विशाल उंबरसाडा, प्रवीण बांबरे, जयराम बांबरे, प्रविण फडवले, सुरेखा बांबरे, निर्मला गुणगुणे, सुनीता दांडेकर यांसह मोठया संख्येने कवटेपाडा येथील ग्रामस्थ उपस्थित होते.